SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २६.१०.२०२६ | अंक नं. १७५ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020










# कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गायी नगरमध्ये पकडल्या; गुन्हा दाखल

नगर - कत्तलीसाठी दाटीवाटीने व अमानुषपणे डांबून नेल्या जाणाऱ्या दोन गायींना शहरातील नेप्ती नाका कल्याण रोड परिसरात तोफखाना पोलिसांनी कारवाई करत मुक्त केले आहे. या प्रकरणी वाहन चालकासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास डायल ११२ या आपत्कालीन यंत्रणेवर मिळालेल्या माहितीनुसार, नेप्ती नाका येथे एका पिकअप वाहनातून जनावरे कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याचे समजले. या माहितीच्या आधारे तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन खात्री केली असता हा प्रकार समोर आला.

सदर पिकअप वाहनात दोन जर्शी गायी अत्यंत दाटीवाटीने, उपाशीपोटी आणि विनाअन्न पाण्याचे क्रूरपणे डांबून कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. या बेकायदेशीर वाहतूक प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळावरून रज्जाक इब्राहिम पठाण (रा. पिंपळाचा मळा, ता. राहुरी) आणि पिकअप चालक निलेश मनोहर बेल्हेकर (रा. टाकळीमियाँ, ता. राहुरी) या दोघांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी घटनास्थळावरून ५० हजार रुपये किमतीची एक आणि ३० हजार रुपये किमतीची दुसरी अशा दोन गायी तसेच ५ लाख रुपये किमतीचे पिकअप वाहन असा एकूण ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींकडे जनावरे वाहतुकीचा परवाना व विक्रीचा परवाना याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे आढळली नाहीत.

या प्रकरणी पोलीस नाईक महेश शेळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.










अहिल्यानगर
शॉप नं. २५८८, लोकसेवा हॉटेल जवळ, एम्. जी. रोड, कापडबाजार. ☎ ०२४१-२९९१६६०
शॉप नं. १ ते ३, ग्राऊंड फ्लोअर, माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी. ☎ ०२४१-३३५३०९२







दिवाळी महासेल..स्टॉक असेपर्यंत...
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर — रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
लेडीज : स्मॉल ते X L टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस — रु.२५०/-
टू पीस 3 X L ते 6 x L — रु.३००/-
✻ लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
✻ लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
✻ बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
✻ ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
✻ जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नागरदेवळे परिसरामध्ये भरदिवसा घर फोडून चोरी

नगर - नगर तालुक्यातील नागरदेवळे परिसरातील शुकलेश्वर मंदिराजवळ एका बंद घराचे मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरांनी १ लाख ३७ हजार ५० रुपयांच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंबिका जयदत्त गोंधळे (वय २५, रा. शुकलेश्वर मंदिराजवळ, नागदेवळे, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजेपासून ते दुपारी २.१५ वाजे दरम्यानच्या कालावधीत फिर्यादीचे घर बंद होते. याच बंद घराचा फायदा घेऊन अज्ञात चोरांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडले व अनाधिकाराने घरात प्रवेश केला. घरातून सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ३७ हजार ५० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (३), ३०५ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करत आहेत.

# वाकोडी शिवारात ४२ वर्षीय इसमाचा खून

## मुलानेच पित्याचा खुन केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न

नगर - नगर तालुक्यातील वाकोडी शिवारात सोलापूर रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ एका ४२ वर्षीय इसमाचा खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या खुनाचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २४ तासांत उलगडा केला असून मुलानेच आपल्या पित्याचा खून केल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव दिलीप करमदास भोसले (वय ४२, रा. वाकोडी शिवार, सोलापूर रोड, ता. नगर) असे आहे. तर त्याचा मुलगा अंबर दिलीप भोसले (वय १९, रा.वाकोडी, ता. नगर) यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

ही घटना २४ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते २५ ऑक्टोबर रोजी पहाटे ४.५३ वाजे दरम्यान वाकोडी येथील पाण्याच्या टाकी जवळ घडली. घटनेच्या दिवशी भिंगार कॅम्प पोलिसांना आपत्कालीन ११२ क्रमांकावरून फोन आला होता. भोसले नावाच्या एका कॉलरने फोन करून वाकोडी येथील पाण्याच्या टाकीजवळ मर्डर झाल्याची माहिती दिली. या माहितीनंतर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात व अन्य पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी रवाना झाले.

घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, तिथे एका इसमाच्या कानातून रक्त येत असलेल्या स्थितीत तो जमिनीवर बेशुद्ध अवस्थेत पडलेला निदर्शनास आला. त्याला पोलिसांनी तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविले, मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. अज्ञात व्यक्तीने केलेल्या मारहाणीत दिलीप भोसले याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.


वाकोडी (ता.नगर) परिसरात जन्मदात्या पित्याचा खून करणाऱ्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या प्रकरणी पो.कॉ.बिभीषण काशिनाथ दिवटे (वय ४८, नेमणूक कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. हरिष भोये व पोलीस अंमलदार अतुल लोटके, फुरकान शेख, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, मनोज साखरे, प्रशांत राठोड व भगवान धुळे यांचे पथक करत होते. तपास करत असताना नमूद गुन्हा हा मयताचे मुले अंबर दिलीप भोसले व रोहित दिलीप भोसले (दोन्ही रा.वाकोडी, ता.नगर) यांनी केला असल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. पथकाने तात्काळ वाकोडी परिसरात आरोपीचा शोध घेऊन अंबर दिलीप भोसले यास ताब्यात घेतले.

ताब्यातील आरोपीस गुन्ह्याचे तपासकामी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात असून पुढील तपास भिंगार कॅम्प पोलीस करत आहेत.

# अन्न व औषध प्रशासनाची कारवाई; धने व बडीशेपचा लाखोंचा साठा जप्त

नगर - सण-उत्सवांच्या (फेस्टिव्हल ड्राईव्ह २०२६) पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभाग, राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, नाशिक विभागाचे संयुक्त आयुक्त श्री. माने आणि अन्न विभागाचे सहायक आयुक्त एस. एच. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा पथकाने २४ ऑक्टोबर रोजी संगमनेर येथील एका अन्न प्रक्रिया उद्योगावर कारवाई केली. या छाप्यात सुमारे १५ लाख ५६६ रुपये किमतीचा संशयास्पद आणि मिसब्रँडेड अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

मेसर्स जगदंबा फूड प्रॉडक्ट्स, संगमनेर येथे ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ५,९९८ किलोग्रॅम धने डाळ साठा (किंमत ८ लाख ९९ हजार ७०० रुपये) जप्त करण्यात आला आहे. सदर साठा 'डी. ए. पटेल, उंझा, गुजरात' या पुरवठादाराकडून मागवण्यात आला होता.

बडीशेप एकूण ३,५९८ किलोग्रॅम साठा (किंमत ६ लाख ८६६ रुपये) हा साठा देखील 'डी. ए. पटेल, उंझा, गुजरात' यांच्याकडून आलेला होता.असा एकूण जप्त साठा ९,५९६ किलो ग्रॅम असून त्याची एकूण किंमत १५ लाख ५६६ रुपये आहे. सदर अन्नपदार्थांचा साठा हा 'मिसब्रँडेड' (चुकीची लेबलिंग असलेला) आणि कमी दर्जाचा किंवा आरोग्याला अपायकारक असल्याच्या संशयावरून जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी या साठ्याचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायद्यानुसार पुढील कडक कारवाई केली जाईल.

अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी यु. आर. सूर्यवंशी आणि सहायक आयुक्त (अन्न) परिमंडळ-२ अहिल्यानगर, एस. एच. इंगळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ आणि नियमबाह्य विक्री रोखण्यासाठी प्रशासनाची ही मोहीम अशीच तीव्र गतीने सुरू राहणार असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

# झाडाला गळफास घेत युवकाची आत्महत्या

नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील युवकाने शेतातील झाडाला गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना २६ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. राहुल अशोक कडूस (वय २२, रा.सारोळा कासार, ता.नगर) असे मयत युवकाचे नाव आहे.


राहुल कडूस (मयत)

राहुल याने सारोळा खडकी रस्त्यावर असलेल्या पठार डोंगरावरील शेतात झाडाला गळफास घेतल्याचे सकाळी त्याच्या चुलत्याच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याला तातडीने उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राहुल याने आत्महत्या का केली? याचे कारण समजू शकले नाही. पोलीस त्याबाबत तपास करत आहेत. मयत राहुल याच्या पश्चात आई, वडील, १ बहिण असा परिवार आहे.

# नगर व पारनेर तालुक्यात दहशत निर्माण करणाऱ्या टोळीवर 'मोक्का'

## ११ जणांचा समावेश, खुनाच्या प्रयत्नासह दरोड्यासारखे गंभीर गुन्हे आहेत दाखल

नगर - नगर व पारनेर परिसरात संघटितपणे गुन्हेगारी करत विविध ठिकाणी दहशत निर्माण करणाऱ्या ११ जणांच्या टोळीवर 'मोक्का' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक अधिनियम) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. टोळी प्रमुख रमेश सावत्या भोसले आणि त्याच्या १० साथीदारांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

टोळी प्रमुख रमेश सावत्या भोसले (वय ३८, रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर), देवा उर्फ पावल्या कैलास काळे (वय ३५, रा. कडूस, ता. पारनेर, हल्ली रा. शिरूर, जि. पुणे), तुषार सावत्या भोसले, अविनाश सावत्या भोसले, सुशांत सुरेश भोसले, अनिल सुरेश भोसले, आवेश निरप्या भोसले, लोंढ्या निरप्या भोसले, प्रशांत उर्फ प्रवीण सुरेश भोसले (वय २७), राम उर्फ बोकड्या उर्फ बन्या लखण काळे आणि शरद कैलास काळे (वय ४२, रा. कडूस, ता. पारनेर) अशी मोक्का कारवाई करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

या संघटित टोळीने अहिल्यानगर जिल्ह्यातील एम.आय.डी.सी., नगर तालुका, सुपा, बेलवंडी, श्रीगोंदा पोलीस ठाणे तसेच शेजारील पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारीचे साम्राज्य उभे केले होते. आर्थिक फायद्यासाठी बळाचा वापर करून दरोडा टाकणे, जबरी चोरी, घरफोडी, घातक हत्यारांसह खुनाचा प्रयत्न करणे, शासकीय कर्मचाऱ्यांना कामात अडथळा आणून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करणे आणि अल्पवयीन मुलीची छेडछाड करणे अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे या टोळीवर दाखल आहेत. या टोळीच्या वाढत्या गुन्हेगारी वृत्तीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती गडकरी यांनी सुपा पोलीस ठाण्यात दाखल दरोड्याच्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा १९९९ (मोक्का) अन्वये वाढीव कलमे लावण्याचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांना सादर केला होता. कागदपत्रांची आणि आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची पडताळणी केल्यानंतर विशेष पोलीस महानिरीक्षकांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. पुढील तपास नगर ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने करत आहेत. या कारवाईत अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सुपा पोलीस ठाण्याच्या पो.नि.ज्योती गडकरी, सहाय्यक फौजदार रवींद्र पांडे, पोलीस हवालदार सुयोग सुपेकर आणि अशोक मरकड यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# शेख नूरजहाँ कमरुद्दीन यांचे अल्प आजाराने निधन

नगर - हातमपुरा डवरेगल्ली येथील रहिवासी शेख नूरजहाँ कमरुद्दीन (वय ८९) यांचे २५ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी हसनशाह कादरी कब्रस्तान येथे करण्यात आला.

त्यांच्या मागे ३ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रियाजद्दीन, वसद्दीन, अझउद्दीन यांच्या मातोश्री, चाचा फुटवेअर, ॲपेक्स फॅशन, इंडिया फुटवेअर, ए-वन फुटवेअरचे दिवंगत हाजी कमरुद्दीन यांच्या त्या पत्नी होत.

# युवा क्रिकेटपटू यश जाधवचे अपघाती निधन



नगर - अहिल्यानगरचा युवा क्रिकेटपटू यश अविनाश जाधव (वय २७) याचे २४ ऑक्टोबर रोजी नगरमध्ये अपघाती निधन झाले. यश हा अहिल्यानगरमधील हुंडेकरी स्पोर्टस् अकॅडमीचा खेळाडू होता.

यशने पाँडिचेरी राज्य क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच त्याने सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत पाँडिचेरी संघाचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच महाराष्ट्र प्रीमिअर लीगमध्ये त्याने पुणेरी बाप्पा संघाचे प्रतिनिधित्व केले होते. तो जेट्स या संघाचा प्रमुख खेळाडू होता. त्याच्या पश्चात वडील, आई, आजी असा परिवार आहे.

# जिल्हा बँकेच्या प्रचारासाठी सात दिवस शिल्लक; चुरशीच्या लढतीत मतदारांना घडतेयं लक्ष्मी दर्शन

नगर - जिल्हा सहकारी बँकेच्या सोसायटी मतदारसंघातील चार व जनरलच्या सहा जागा अशा दहा जागांसाठी येत्या २ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झालेल्या आहेत. निवडणुकीसाठी आता सात दिवस शिल्लक असून पुढील रविवारपर्यंत निवडणुकीतील उमेदवारांना जाहीर प्रचार करता येणार आहे. ज्या सोसायटी मतदारसंघासह जनरलच्या लढतीत चुरस आहे तिथे मतदारांना दिवाळीआधीच लक्ष्मी दर्शन घडल्याची उघड चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे या मतदारांची दिवाळी असून ज्या तालुक्यात बिनविरोध निवडी झाल्यात तेथील मतदार काहीसे हिरमुसल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



सोसायटी मतदारसंघातील पारनेर, अकोले, राहुरी व कर्जत या चार ठिकाणी निवडणूक होत असून यातील पारनेरच्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. याठिकाणी खासदार नीलेश लंके व विखे समर्थक, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांच्यात सरळ लढत होत असून ही लढत लंके व शिंदे यांच्यातील नसून विखे व लंके यांच्यातील मानली जात आहे. यात कोण बाजी मारणार याची सर्वांना उत्सुकता आहे. अकोले सोसायटी मतदारसंघात आमदार किरण लहामटे व जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांची कन्या संजीवनी शिंदे यांच्यात होणारी लढत स्वपक्षीयात म्हणजेच राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातच होत आहे. ही लढतही चुरशीने लढली जात आहे. राहुरीत व कर्जतमधील लढतही स्वपक्षीयांमध्येच होत आहे. राहुरीत आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधात देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजीत कदम हे लढत देत असून तनपुरे व कदम हे दोघे भाजपामध्ये आहेत. कर्जतमध्ये विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या समर्थक ज्योती शिंदे व तुषार पिसाळ यांच्यात लढत होत असून दोघे भाजपाचेच कार्यकर्ते आहेत. जनरलच्या होत असलेल्या सहा जागांमध्येही काही लढती लक्षवेधी ठरतील असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

### जिल्ह्यात ३ हजार ८३७ सभासद मतदार

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत तालुकानिहाय सभासद मतदारसंख्याही महत्वाची ठरणार आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये ३ हजार ८३७ सभासद मतदार असून, संगम नेर तालुक्यात सर्वाधिक ७१५ मतदार आहेत. त्याखालोखाल कोपरगावमध्ये ५२९, नगरमध्ये ३९१ आणि श्रीगोंद्यात २९९ मतदार आहेत. राहाता तालुक्यात २६३, राहुरीत तालुक्यात २५८, नेवासा तालुक्यात २४६, अकोलेत २३१ आणि पारनेरमध्ये २२७ मतदार आहेत. कर्जतमध्ये १६८, श्रीरामपूरमध्ये १४७, पाथर्डीत १३१, शेवगावमध्ये ११७ आणि जामखेडमध्ये ११५ सभासद मतदार आहेत. मतदारसंख्या महत्वाची असण्याबरोबरच स्थानिक उमेदवार जनरलच्या जागेत लक्षवेधी मते घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### अशी पार पडेल मतदान प्रक्रिया

चार सोसायटी मतदारसंघात स्थानिक पातळीवर चार मते दिल्यानंतर त्या ठिकाणी असणाऱ्या मतदारांना जनरलच्या सहा जागांवर असणाऱ्या मतदारांना मतदान करावे लागणार आहे. तसेच ज्या ठिकाणी निवडणूक सोसायटी मतदारसंघ बिनविरोध झालेली आहे. त्या ठिकाणी असणाऱ्या मतदारांना केवळ जनरलच्या सहा जागांसाठी मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. यावेळी क्रॉस व्होटींग करताना दक्षता घ्यावी लागणार आहे. अन्यथा मतदान बाद होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

# अशोक गांधी यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर - येथील रहिवासी अशोक चंदनमल गांधी (वय ८२) यांचे २४ ऑक्टोबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २५ ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

गिरीश गांधी व सुविध गांधी यांचे वडील होत.

# दशरथ लोंढे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - केडगाव येथील महावितरणचे सेवानिवृत्त कर्मचारी दशरथ मारुती लोंढे (वय ७४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्यामागे मुलगा, मुलगी, सुना, पुतणे, नातू, बंधू असा परिवार आहे. देविदास लोंढे यांचे ते वडील, तर महावितरणचे कर्मचारी नवनाथ लोंढे यांचे ते चुलते होत.

# नरेंद्र दिकोंडा यांचे ह्रदयविकाराने निधन

नगर - लक्ष्मीबाई कारंजा, चितळे रोड येथील रहिवासी नरेंद्र विश्वनाथ दिकोंडा (वय ५२) यांचे २६ ऑक्टोबर रोजी ह्रदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २७ ला अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुन असा परिवार आहे. लता दिकोंडा यांचे पती, प्रणव व प्रज्वल यांचे वडील होत. स्टेट बँकेचे कर्मचारी ते होते.

# नंदलाल मणियार यांचे अल्प आजाराने निधन

नगर - मेघनंद मसाले, दाळमंडई येथील रहिवासी नंदलाल मुरलीधर मणियार (वय ७७) यांचे २५ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ भाऊ, भावजया, पत्नी, ४ मुली असा परिवार आहे. रामेश्वर, गोपाल, देवकिशन यांचे मोठे बंधू, किरण, गोविंद, मयुर, राहुल यांचे चुलते तर पुरुषोत्तम नावंदर यांचे मामा होत. अहिल्यानगर रामकृष्ण सेवा ट्रस्टचे ते अध्यक्ष होते. पुष्पाबाई मणियार यांचे ते पती होत.

# 'चारा छावणी, मोफत धान्य ऐवजी' थेट जीवन निर्वाह भत्ता देण्यात यावा

नगर - दुष्काळामुळे उपासमारीची वेळ आलेल्या शेतमजूर व रोजंदारी कुटुंबांना चारा छावणी तसेच मोफत धान्य ऐवजी थेट रोख रक्कमेचा जीवन निर्वाह भत्ता द्यावा, अशी मागणी संदीप भांबरकर यांनी शासनाकडे केली आहे. मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जगण्याचा हक्क म्हणजे फक्त श्वास घेणे नाही, तर सन्मानाने पोटभर जगणे. दुष्काळात रोजगार बंद झाला की शेतमजूर हा वंचित होतो. त्याला जगवणे ही कायद्यानुसार शासनाची जबाबदारी आहे. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याबरोबर शासनाने तातडीने संबंधीत बाधीत कुटुंबांना प्रत्यक्ष मदत, अन्न सुरक्षा आणि रोजगार द्यावा, केवळ कागदी घोषणा करू नये, असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. दुष्काळ ही राष्ट्रीय आपत्ती असून, शेतमजुराचा रोजगार बुडणे म्हणजे त्याचा जीवन निर्वाह बुडणे आहे, त्यामुळे थेट रोख मदत देणे हे कायद्याच्या उद्देशात बसते.

### आठ ते दहा हजार मासिक खर्च द्यावा

चारा छावणीत काय होते हे सगळ्यांना माहिती आहे: एका जनावराला ७० रुपये चारा दाखवतात, प्रत्यक्षात २० रुपयांचा देतात. ५ किलो धान्यात २ किलो खडक. पण जर पैसे थेट बँक खात्यात गेले, तर १ रुपयाचाही भ्रष्टाचार होणार नाही. कायद्याने १०० दिवस काम मिळाले पाहिजे. पण दुष्काळात जमिनीत पाणीच नाही तर काम कुठून देणार? काम नाही तर मजुरी नाही त्यामुळे उपासमार होते म्हणून छावणीऐवजी थेट भत्ता हा एकमेव उपाय आहे. आज चार माणसांच्या शेतमजुर कुटुंबाला जगायला सरासरी ८ ते १० हजार रूपये मासिक खर्च आहे. शासनाकडे पैसा आहे पण फक्त वाटप चुकीचे आहे: केंद्र सरकार दुष्काळासाठी हजारो कोटी देते. पण ते कंत्राटदाराला जाते. आमची मागणी आहे की तोच पैसा लोकांच्या खात्यात जमा करा. यामुळे स्थलांतर थांबेल. पोटासाठी लोक मुंबई, पुण्याला पळतात, झोपडपट्टी वाढते. जर गावातच ८००० रुपये मिळाले, तर माणूस गाव सोडणार नाही. शहरांवरील ताण कमी होईल.

### लाभार्थ्यांची यादी महिन्याला ग्रामपंचायत फलकावर लावावी

महिला व लहान मुलांचे कुपोषण होते. दुष्काळात सर्वात जास्त हाल महिलांचे आणि मुलांचे होतात. पैसा महिलेच्या जनधन खात्यात गेला तर घरात अन्न येते, हे सिद्ध झाले आहे. प्रत्येक भूमिहीन, शेतमजूर, विधवा, दिव्यांग कुटुंबाला दरमहा १० हजार द्यावे. ही यादी ग्रामसभेने करावी, तलाठ्याने नाही. प्रत्येक महिन्याला यादी ग्रामपंचायत फलकावर लावावी.

### पंधरा दिवसांत निर्णय न झाल्यास जनहित याचिका

लोकांचे पोषण आणि राहणीमान उंचावणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे, हा अन्नाचा प्रश्न आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यानुसार प्रत्येक गरीब कुटुंबाला अन्न मिळालेच पाहिजे. धान्य वाटपात भ्रष्टाचार होत असेल तर रोख रक्कम देणे हा कायदाच सांगतो. दुष्काळात चारा छावणी ऐवजी शेतकऱ्याला थेट रोख रक्कम देऊन चारा विकत घेण्यास सांगावे. आपत्ती कायद्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना दुष्काळात सर्व प्रकारची तातडीची मदत आणि वाटप करण्याचे पूर्ण अधिकार आहेत.सरकारने १५ दिवसात याबाबत निर्णय न घेतल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा भांबरकर यांनी दिला आहे.

# नगरसेवकाकडून महिलेसह तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी

नगर - कौटुंबिक मालमत्तेच्या वादातून नगरसेवक मोहित प्रदीप पंजाबी यांनी आपल्याला तसेच आपल्या मुलगा आणि मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप नूतन पंकज मवाल यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार अर्ज तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी नगरसेवक मोहित प्रदीप पंजाबी व प्रदीप बिशनसिंग पंजाबी यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. नूतन मवाल यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पती आणि सासरे यांच्यात मालमत्तेवरून न्यायालयात वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर १२ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.२४ वाजता मोहित पंजाबी यांनी मोबाइलवर संपर्क साधून न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणातून माघार घ्या नाहीतर तिला आणि तिच्या मुलांना उचलून मारून टाकण्याची धमकी देण्यात आली असल्याचे म्हंटले आहे.तसेच, आपल्या कुटुंबाच्या जीविताला धोका असल्याची भीती व्यक्त करत तातडीने पोलीस संरक्षण देण्याची मागणी त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### जगा वर्तमानात...!

माइंडफुलनेस म्हणजे कोणत्याही कृती किंवा विचारादरम्यान पूर्णपणे वर्तमानात जगणे आणि आजूबाजूच्या परिस्थितीशी एकरूप होणे होय. ही कोणतीही कठीण ध्यानपद्धती नसून सहज सामावून घेता येण्यासारखी जीवनशैली आहे. मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी आणि ताणतणाव पूर्णपणे दूर करण्यासाठी रोजच्या आयुष्यात काही विशिष्ट सवयींचा अंगीकार करणे अत्यंत आवश्यक असते. सकाळची सुरुवात करताना घाईगडबड न करता शांतपणे आणि सकारात्मक विचारांनी करावी. स्वतःच्या श्वासावर लक्ष केंद्रित करावे. चहा किंवा कॉफी पिताना फक्त त्याच अनुभवावर लक्ष ठेवावे, जेणेकरून मेंदूला विश्रांती मिळते. दिवसाच्या इतर वेळी जेव्हा कधी कामाचा ताण वाढल्यासारखा वाटेल, तेव्हा काही सेकंदांसाठी आपले सर्व काम थांबवून फक्त दीर्घ श्वास घ्यावा आणि श्वासाची गती अनुभवावी. यामुळे मनातील विचारांचा गोंगाट शांत होतो आणि ताण त्वरित कमी होतो. खाण्यापिण्याच्या सवयींमध्येही माइंडफुलनेस आणणे गरजेचे आहे. जेवताना टीव्ही बघणे किंवा मोबाईल चालवणे टाळावे आणि अन्नाची चव, त्याचा सुगंध आणि प्रत्येक घासाचा आनंद घेत शांतपणे जेवावे, ज्यामुळे पचनक्रिया सुधारते. याशिवाय, दिवसभरात किमान काही वेळ निसर्गाच्या सान्निध्यात घालवणे मनासाठी खूप फायदेशीर ठरते. उघड्या पायांनी गवतावर चालणे, झाडांचे निरीक्षण करणे यांमुळे शरीरातील ताण निर्माण करणारे घटक कमी होतात आणि मन प्रसन्न राहते. कामाच्या बाबतीत एकाच वेळी अनेक कामे करण्याची सवय टाळावी. जेव्हा आपण एका वेळी एकच काम पूर्ण एकाग्रतेने करतो, तेव्हा कामाची गुणवत्ता सुधारते आणि मेंदूवर अनावश्यक ताण पडत नाही. रात्री झोपण्यापूर्वी संपूर्ण दिवसात घडलेल्या चांगल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची सवय ठेवावी. कोणत्या चांगल्या गोष्टींमुळे आजचा दिवस आनंददायी झाला याची मनातल्या मनात नोंद केल्याने नकारात्मक विचार नाहीसे होतात आणि गाढ झोप लागण्यास मदत होते. या काही चांगल्या सवयी आहेत.

## पाककला

### स्मोक्ड बदाम हलवा बाईट्स्

**साहित्य :** बदाम १ वाटी (भिजवून साल काढलेले), साखर ३/४ वाटी, तूप ४ चमचे, दूध १/२ वाटी, मिल्क पावडर २ चमचे, वेलची पावडर १/४ चमचा, केशर काड्या ८-१०, स्मोक देण्यासाठी - कोळशाचा छोटा तुकडा १, तूप १/२ चमचा

**कृती :** भिजवलेले बदाम मिक्सरमध्ये दूध घालून बारीक वाटून घ्या. कढईत २ चमचे तूप गरम करून त्यात बदामाची पेस्ट घालून मध्यम आचेवर ५ मिनिटे परतून घ्या. त्यात साखर, मिल्क पावडर व केशर घातलेले दूध घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत सतत ढवळत रहा. त्यात उरलेले तूप व वेलची पावडर घालून मिश्रण कढई सोडू लागले की गॅस बंद करा. एका छोट्या वाटीत पेटवलेला कोळसा ठेवून त्यावर अर्धा चमचा तूप टाका व ही वाटी हलव्याच्या कढईत ठेवून २ मिनिटे झाकण ठेवून स्मोक द्या. नंतर कोळसा काढून मिश्रण तूप लावलेल्या ट्रेमध्ये थापून घ्या. कोमट झाल्यावर चौकोनी बाईट्समध्ये कापून बदाम कापाने सजवून सर्व्ह करा.

## वास्तू

### जेवणाचे टेबल

✽ जेवणाचे टेबल घराच्या पश्चिम किंवा उत्तर भागात असावे. रेफ्रिजरेटर (फ्रिज) नेहमी उत्तर-पश्चिम (वायव्य) दिशेला ठेवावा.

✽ घरातील अन्नधान्य, गहू-तांदळाची पोती नेहमी नैऋत्य किंवा पश्चिम दिशेला ठेवावीत. किचनमध्ये तुटलेली किंवा तडा गेलेली चिनी मातीची भांडी अजिबात वापरू नयेत.

## सौंदर्य

चेहऱ्यावरील रक्ताभिसरण वाढवण्यासाठी आणि मुरुमांची जळजळ कमी करण्यासाठी मऊ कपड्यात बर्फ गुंडाळून चेहऱ्यावर हलकेसे फिरवावे.

## सल्ला

गरम कढई किंवा भांडे थेट थंड किंवा ओल्या जागेवर ठेवू नका, भांड्याला तडे जाऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६**

**शुक्र पूर्व दर्शन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, भरणी १५|३९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** कामात यश मिळून आर्थिक लाभ होईल.

**वृषभ :** जुन्या गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळेल.

**मिथुन :** नवीन लोकांशी संपर्क होईल, भविष्यात मोठा फायदा होऊ शकतो.

**कर्क :** कौटुंबिक प्रश्न सुटतील आणि मानसिक शांतता लाभेल.

**सिंह :** मान-सन्मानात वाढ होईल, अडकलेली कामे मार्गी लागतील.

**कन्या :** आरोग्याच्या जुन्या तक्रारी दूर होतील.

**तुळ :** भागीदारीच्या कामात फायदा होईल. दिवस चांगला आहे.

**वृश्चिक :** अनपेक्षित धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**धनु :** प्रवासाचे योग असून धार्मिक कार्यात सहभाग वाढेल.

**मकर :** मालमत्तेशी संबंधित बाबींमध्ये मोठा निर्णय घेतला जाईल.

**कुंभ :** मित्रपरिवाराचे सहकार्य लाभेल आणि वैवाहिक जीवनात गोडवा.

**मीन :** आर्थिक प्रगतीचे नवे मार्ग खुले होतील.

# शब्दगंध क्र. ७५४४

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ४ | ५ |
| | ■ | ६ | ७ | | ■ | ८ | |
| ८ | १० | ■ | ११ | | १२ | | |
| ■ | | ■ | ■ | १३ | | | ■ |
| १४ | | १५ | १६ | ■ | | ■ | १७ |
| १८ | | | | ■ | १९ | २० | |
| | ■ | | ■ | २१ | | | ■ |
| २२ | | | ■ | ■ | २३ | | |

**आडवे शब्द :-** १) नेहमी; नित्य ३) उचलता न येईल इतक्या वजनाचा ६) केर; गदळ ८) तपास; शोध; ठावठिकाणा; पत्ता ९) फुलातील गोड रस; मकरंद ११) जड; पतदार; प्रतिष्ठित १३) कटी; कंबर; नितंब १४) येणे १८) ग्लानी; शीण; थकवा १९) हल्ला; आक्रमण; ॲटॅक २१) महाभारत कथेतील एक राजा; एक भारतीय क्रिकेटपटू (फक्त नाव) २२) एक स्थितिस्थापक पदार्थ ज्याच्यापासून टायर, ट्यूब आदी वस्तू तयार केल्या जातात २३) घर, गृह (हिंदी, उर्दू)

**उभे शब्द :-** १) मुस्लिम वैद्य २) वनस्पती; भाजीपाला ३) गोंधळाची अवस्था; बेबंदशाही ४) पोलिसांतील एक पद; कोतवाल ५) उतरण; ढाळ; टेकडी; कडपा ७) रुची; स्वाद; गोडी १०) घोंगडी तयार करणारा एक समाज; मेंढपाळ १२) खाल्लेल्या मिठाला न जागणारा (हिंदी, उर्दू), अमिताभ बच्चन, राजेश खन्ना यांचा एक हिंदी चित्रपट १४) विधानसभा किंवा विधानपरिषदेचा सभासद १५) गर्विष्ठ १६) निषध देशाचा राजा; दमयंतीचा पती १७) पांघरण्याचे एक उंची वस्त्र २०) एक प्रकारचा जुगार

### शब्दगंध क्र. ७५४३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | प | हा | र | गृ | ह | ■ | पा |
| पा | ठ | क | ■ | हि | र | क | णी |
| स | ■ | ■ | क | णी | क | ■ | दा |
| ना | वा | ज | ली | ■ | त | वा | र |
| ■ | च | ■ | द्वा | स | ■ | ता | ■ |
| ध | न | ग | र | ■ | प्र | या | स |
| न | ■ | रा | ■ | प | ल | त | ड |
| को | यं | डा | ■ | सा | य | ■ | क |

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

**सुविचार :** विचारांची शुद्धता हीच माणसाची खरी संपत्ती आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आकाश दिवसा निळे आणि संध्याकाळी लाल का दिसते?

सूर्याचा प्रकाश पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतो तेव्हा सकाळी आणि दुपारी आकाश निळे, तर संध्याकाळी किंवा सूर्यास्ताच्या वेळी ते पिवळे, नारंगी आणि लाल का दिसते, यामागचे सविस्तर आणि संपूर्ण वैज्ञानिक स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे. सूर्यापासून येणारा प्रकाश हा आपल्याला जरी एकाच रंगाचा (पांढरा) दिसत असला, तरी तो प्रत्यक्षात सात निरनिराळ्या रंगांचे मिश्रण असतो. या सात रंगांमध्ये जांभळा, निळा, हिरवा, पिवळा, नारंगी आणि लाल या रंगांचा समावेश होतो. विज्ञानाच्या नियमानुसार प्रत्येक रंगाची स्वतःची विशिष्ट तरंगलांबी (लहरींची लांबी) आणि ऊर्जा असते. जांभळा आणि निळा या रंगांची तरंगलांबी खूप लहान असते आणि त्यांच्यात ऊर्जा जास्त असते, तर पिवळा, नारंगी आणि लाल या रंगांची तरंगलांबी खूप मोठी असते आणि त्यांच्या लहरी लांब अंतरापर्यंत सहज प्रवास करू शकतात.

पृथ्वीच्या सभोवताली हवेचे अत्यंत जाड आवरण पसरलेले आहे, ज्याला आपण वातावरण म्हणतो. या वातावरणात नायट्रोजन आणि ऑक्सिजन वायूंचे अब्जावधी सूक्ष्म रेणू, धुलिकण आणि पाण्याची वाफ उपस्थित असते. जेव्हा सूर्याचा पांढरा प्रकाश पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतो, तेव्हा तो या हवेतील सूक्ष्म कणांवर आणि वायूंच्या रेणूंवर आदळतो. या धडकेमुळे प्रकाशाच्या लहरी सर्व दिशांना विखुरल्या जातात.

या नैसर्गिक आणि वैज्ञानिक घटनेला शास्त्रीय भाषेत 'रेले स्कॅटरिंग' म्हणजेच प्रकाशाचे विखुरणे असे म्हणतात. लहान तरंगलांबी असलेले रंग सूक्ष्म कणांमुळे खूप पटकन सर्व दिशांना विखुरले जातात, तर मोठ्या तरंगलांबीचे रंग कणांना न अडकता थेट पुढे निघून जातात. सकाळी सूर्य उगवताना किंवा दुपारी तो आपल्या डोक्याच्या अगदी जवळ असतो, तेव्हा सूर्याच्या किरणांना पृथ्वीच्या वातावरणातून आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी खूप कमी अंतर पार करावे लागते. या कमी अंतराच्या प्रवासात सूर्याच्या पांढऱ्या प्रकाशातील निळा आणि जांभळा रंग वातावरणातील वायूंच्या रेणूंवर धडकताच चारी बाजूंना मोठ्या प्रमाणावर विखुरतो. मानवी डोळ्यांची रचना जांभळ्या रंगापेक्षा निळ्या रंगासाठी जास्त संवेदनशील असल्यामुळे वातावरणात सर्वत्र विखुरलेला हा निळा प्रकाश आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचतो आणि आपल्याला संपूर्ण आकाश स्वच्छ निळे दिसते.

संध्याकाळी जेव्हा सूर्य क्षितिजाकडे झुकतो, तेव्हा संपूर्ण परिस्थिती बदलते. सूर्याची किरणे पृथ्वीवर तिरपी पडू लागल्यामुळे सूर्याच्या प्रकाशाला वातावरणाचा खूप मोठा आणि लांबचा थर ओलांडून आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचावे लागते. या लांबच्या प्रवासात निळा, जांभळा आणि हिरवा यांसारख्या लहान तरंगलांबी असलेल्या रंगांचे किरण वातावरणात वाटेतच सर्व दिशांना विखुरले जाऊन मागेच नष्ट होतात. याउलट पिवळा, नारंगी आणि लाल या रंगांची तरंगलांबी खूप मोठी असल्यामुळे हे रंग वातावरणातील धुलिकण आणि हवेच्या अडथळ्यांना सहज भेदून थेट आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचतात. अशा प्रकारे लांबचा प्रवास पार करून फक्त पिवळा आणि लाल रंगाचे किरणच आपल्यापर्यंत पोहोचू शकत असल्यामुळे संध्याकाळी आकाश निळे न दिसता पिवळ्या, नारंगी आणि लाल रंगांच्या अत्यंत सुंदर छटांनी व्यापलेले दिसते.

## छोटे काम

एका मोठ्या शहरात सुहास नावाचा एक तरुण राहत होता. तो उच्चशिक्षित होता आणि एका मोठ्या कंपनीत व्यवस्थापक म्हणून नोकरीला लागला होता. सुहासला त्याच्या शिक्षणाचा आणि पदाचा खूप अभिमान होता. त्याला वाटायचे की, कागदपत्रे हाताळणे, बैठका घेणे आणि लोकांना आज्ञा देणे हीच खरी आणि मोठी कामे आहेत. ऑफिसमधील झाडलोट करणे, चहा आणून देणारे किंवा छोट्या-मोठ्या वस्तू वेळेवर पोहोचवणारे कर्मचारी यांच्या कामाला तो फारसे महत्त्व देत नसे. ही लहानसहान कामे तर कोणीही करू शकतं, यात काय विशेष? असा त्याचा विचार होता.

त्याच कंपनीत रामूकाका नावाचे एक वृद्ध गृहस्थ काम करत होते. कंपनीतील अत्यंत साधी आणि छोटी कामे - जसे की फाइल्स योग्य ठिकाणी ठेवणे, टेबल-खुर्च्या स्वच्छ ठेवणे आणि वेळेवर कागदपत्रे पोहोचवणे - ही कामे ते अत्यंत प्रामाणिकपणे आणि आनंदाने करायचे.

एकदा कंपनीत एका खूप मोठ्या परदेशी क्लायंटसोबत महत्त्वाचा करार होणार होता. त्या करारावर कंपनीचे भवितव्य अवलंबून होते. सर्व वरिष्ठ अधिकारी आणि परदेशी पाहुणे बैठकीच्या खोलीत उपस्थित होते. सुहास स्वतः या कराराचे सादरीकरण करणार होता.

सादरीकरणाची वेळ झाली. सुहासने आत्मविश्वासाने लॅपटॉप सुरू केला, पण त्याला अचानक आठवले की, मुख्य कराराची मूळ प्रत आणि नकाशा त्याच्या टेबलवरच राहून गेले आहेत! पाहुण्यांसमोर ही चूक उघड झाली असती, तर कंपनीची मोठी नाचक्की झाली असती आणि करोडो रुपयांचा करार हातातून गेला असता. सुहासच्या कपाळावर घामाचे थेंब जमा झाले.

त्याच वेळी बैठकीच्या खोलीचा दरवाजा हळूच उघडला. रामूकाका आत आले. त्यांच्या हातात ती महत्त्वाची फाइल आणि नकाशा होता. सादरीकरण सुरू होण्याच्या १० मिनिटे आधी रामूकाकांनी सुहासच्या टेबलवर ती फाइल पाहिली होती. ती फाइल किती महत्त्वाची आहे, हे त्यांच्या अनुभवातून त्यांच्या लक्षात आले होते. त्यांनी कसलाही वेळ न गमावता ती फाइल अत्यंत सुरक्षितपणे बैठकीच्या खोलीत आणून दिली होती.

त्या करारावर यशस्वीरीत्या सह्या झाल्या. सर्व पाहुणे गेल्यानंतर कंपनीच्या मालकांनी रामूकाकांचे जाहीर कौतुक केले. सुहासला स्वतःच्या विचारांची खूप लाज वाटली. तो रामूकाकांकडे गेला आणि म्हणाला, काका, आज तुमच्यामुळे आमचा एवढा मोठा करार वाचला. मी आजवर तुमच्या कामाला खूप लहान समजत होतो, मला माफ करा.

त्यावर रामूकाका हसून म्हणाले, साहेब, एका मोठ्या इमारतीला धरून ठेवण्यात जितका वाटा मोठ्या खांबांचा असतो, तितकाच वाटा पायातील एका छोट्या विटेचाही असतो. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते; ते काम आपण किती जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे करतो, यावर त्याचे महत्त्व ठरते. सुहासला त्याच्या आयुष्यातील सर्वात मोठा धडा मिळाला होता. त्या दिवसापासून त्याने प्रत्येक कामाचा आणि ते काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आदर करायला सुरुवात केली.

तात्पर्य : कामाची उंची त्याच्या स्वरूपावरून नाही, तर ते करणाऱ्याच्या प्रामाणिकपणावरून ठरते. समाजातील किंवा कोणत्याही संस्थेतील प्रत्येक छोटे-मोठे काम महत्त्वाचे असते; म्हणूनच कोणत्याही कामाला किंवा काम करणाऱ्या व्यक्तीला कधीही लहान समजू नये.

# आत्मशक्ति



## अध्यात्मिक शक्ती

ह्या कंपनाने ज्योति आणि श्रुतीचे रुप धारण केले. ह्या दिव्य धारांनी संपूर्ण सृष्टीची निर्मिती झाली. जसजसे ही धारा आपल्या स्त्रोतापासून पुढे सरकली तसतशी दिव्य कंपनांची गती बदलत गेली व त्यानुसार बदलत्या अशा वेगवेगळ्या गतीच्या कंपनांनी वेगवेगळ्या मंडळांची रचना झाली व शेवटी ज्योति व श्रुतिद्वारा ह्या भौतिक मंडळाची स्थापना झाली.

आमच्या ह्या भौतिक मंडळात ह्या कंपन अथवा तरंगांचे घनत्व सर्वात जास्त आहे. इतके की हे तरंग जड पदार्थांच्या रुपात प्रगट होतात. फक्त काही दशकांपासूनच वैज्ञानिकांना असे आढळून आले आहे की आजपर्यंत आम्ही ज्यांना भरीव (घन) पदार्थ समजत होतो ते तसे नसून प्रत्यक्षात ऊर्जाशक्तिचे उधळत असलेले कण आहेत. प्रत्येक जड पदार्थामध्ये ऊर्जा आहे जिच्यात ज्योति आणि श्रुति आहेत. जेव्हा आम्ही एखाद्या परमाणूचे विच्छेदन करतो तेव्हा त्यातून तीव्र अशी ज्योति व ध्वनी निघतो. आमच्या ह्या भौतिक जगात असलेली ज्योति व श्रुती ही परमेश्वरापासून निघालेल्या ज्योति आणि श्रुतीच्या धारेचे सर्वात जास्त घनरुप आहे. ह्या ज्योति, श्रुती धारांनी पूर्ण सृष्टी निर्माण झाली व तीच धारा ही संपूर्ण सृष्टी चालवित आहे.

ज्योति व श्रुतीच्या धारा परमेश्वरापासून उत्पन्न होतात व त्याच्यातच विलीन होतात. ह्या धारा आम्ही दिव्य चक्षुवर अथवा शिवनेत्रावर पकडू शकतो. हे केंद्र (शिवनेत्र) आमच्या शरीरांतर्गत असलेल्या आत्म्या व परमेश्वराच्या ज्योति-श्रुतीमध्ये संपर्क स्थापित करते. जेव्हा आम्ही आमचे ध्यान या केंद्रावर स्थिर करतो तेव्हा आम्ही ज्योति श्रुतीशी संपर्क स्थापन करून वरच्या मंडळात जाऊ शकतो. शेवटी ही धारा आम्हाला पुनश्च आमच्या मूळ स्त्रोतापर्यंत म्हणजेच परमेश्वरापर्यंत घेऊन जाते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

## नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय : सकाळी आपण घराबाहेर पडतो तेव्हा आपल्या सगळ्यांचाच फिट दिसायचं असतं. पण जर आपण उदास चेहऱ्याने आणि रुक्ष अंतःकरणाने घराबाहेर पडलो तर 'लोक काय म्हणतील,' असा विचार कधीच करत नाही.

शिवानीदीदी : आपल्याला वाटतं की पोशाख, वागणं-बोलणं, काम आणि समाजातलं स्थान यांच्या आधारे लोक आपल्यावर प्रेम करतात, आपला आदर करतात आणि आपल्याला स्वीकारतात. म्हणून आपण नेहमीच बाह्य पैलूंवर लक्ष केंद्रित करतो.लोकांच्या मतांची काळजी करणं हा संस्कार आपल्यात इतका रुजला आहे की आपल्या आयुष्यातले महत्त्वाचे निर्णयही आपण ह्याच विचाराने घेतो. यामुळे, आपण समाजात राहतो त्यामुळे समाजाची मंजुरी असणं गरजेचं आहे, असा सर्वसामान्य विचार असतो. आपल्यामुळे इतर लोक दुखावले जाऊ नयेत याची काळजी घ्यायलाच हवी. पण त्याही पलीकडे आपण आपले आणि आपल्या कुटुंबाच्या सोयीसुविधेवर आधारित निर्णय घ्यावेत.आपलं मन अशांत असतं तेव्हा आपण प्रेमस्वरूप होऊ शकत नाही. इतरांच्या मतांवर किंवा प्रतिक्रियांवर आपली मानसिक अवस्था अवलंबून असेल तर शांत राहणं आपल्यासाठी खूप अवघड आहे. भलेही आपण कितीही प्रयत्न केले तरी काही जण आपल्या निर्णयांची प्रशंसा करतील आणि काही जण टीका करतील. (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो ऐकलंत का? शेजारचे शर्माजी रोज ऑफिसला जाताना बायकोला मिठी मारतात. तुम्ही का मारत नाही?

नवरा : अगं वेडी आहेस का? तिची ओळख तरी कुठेय मला!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✽ भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार 'भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक' यांची नियुक्ती केली जाते? - कलम १४८

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

पाळीच्या नव्या दिवसापर्यंत समागम होऊ न देता शुक्राणूंचे (वीर्याचे) रक्षण करावे व पाळीच्या १० व्या दिवसापासून ते १८ व्या दिवसापर्यंत रोज रात्री समागम करावा. गर्भाधान विधीच्या काळात सकारात्मक विचारसरणी असावी, तामसी आहार करू नये. संध्याकाळचे जेवण पोटभर करू नये. क्रोध, चिंता, शोक या गोष्टींपासून लांब राहावे. गर्भाधान विधीच्या संध्याकाळी स्नान करून कुलदेवतेला वंदन करून शुभ्र वस्त्रे परिधान करावीत. शयनगृहात धूप, फुले, अत्तर यांपैकी मनाला आनंद देणाऱ्या वस्तू ठेवाव्यात. देवाजवळ निरंजन लावावे. गर्भामध्ये सुसंस्कारित आत्म्याचा प्रवेश होण्यासाठी इष्टदेवतेजवळ प्रार्थना करावी. दिव्याची ज्योत साधारणतः दोन फूट अंतरावर ठेवून दिव्याकडे पतीपत्नीने एकटक पाहावे. ज्योतीला आत्मा मानून आपण त्यावर संस्कार करीत आहोत असे मानावे. ज्योत आतली असो वा बाहेरची ती परब्रह्मस्वरूप मंगल व पवित्र आहे. अशा प्रकारे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व वात, पित्त, कफ हे त्रिदोष आणि जीव-आत्मा यांपासून गर्भ तयार होतो. चांगला गर्भ व चांगल्या जीवात्म्याचा प्रवेश होण्यासाठी इष्टदेवतेजवळ प्रार्थना करावी. दोघांनी शुभ्र, फिक्या रंगाचे वस्त्र परिधान करून ग्लासभर गायीचे दूध प्यावे. शयनगृहामधील वातावरण सुंदर, स्वच्छ व पवित्र असावे. शय्या आकाराने मोठी असावी. त्यावर घातलेली चादर स्वच्छ फिक्या रंगाची असावी.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# समर्पण चातुर्मासानिमित्त उत्तराध्ययन सूत्राचे मंगलमय वाचन

### आनंद समवशरण येथे बोरा व लोढा परिवाराच्या वतीने ग्रंथाची शोभायात्रा



उत्तराध्ययन सूत्र ग्रंथ पालखी आनंद समवशरण येथे नेताना समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा व त्यांच्या धर्मपत्नी निर्मला बोरा तसेच राजकुमार बोरा.

नगर – महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा. यांच्या पावन सान्निध्यात सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या प्रेरणेने तथा श्री तीर्थेशऋषिजी म. सा. यांच्या सहवासात भगवान महावीर स्वामी यांच्या दिव्य शिकवणीचा अनमोल ठेवा असलेल्या उत्तराध्ययन सूत्राचे मंगलमय वाचन सुरू असून, या धार्मिक उपक्रमाला अहिल्यानगर–मधील जैन श्रावक–श्राविकांचा प्रतिसाद लाभत आहे. २० ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या विशेष उपक्रमांतर्गत दररोज सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत गुरुदेव श्री प्रवीणऋषिजी म. सा. स्वतः उत्तराध्ययन सूत्राचे वाचन करतात. त्यातील गहन आध्यात्मिक तत्त्वज्ञान, जीवनमूल्ये आणि आत्मकल्याणाचा संदेश सर्वसामान्य भाविकांना समजेल अशा सोप्या भाषेत स्पष्ट करून सांगितला जात आहे. गुरुदेवांच्या श्रीमुखातून भगवान महावीर स्वामी यांच्या शिकवणीचे श्रवण करण्यासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहत आहेत.

भगवान महावीर स्वामी यांच्या निर्वाणापूर्वीच्या अखेरच्या ४८ तासांतील उपदेशाचा सार म्हणजे उत्तराध्ययन सूत्र, अशी या उपक्रमाच्या संदर्भात भाविकांमध्ये श्रद्धा व्यक्त केली जात आहे. या पवित्र ग्रंथातील शिकवण गुरुदेवांच्या मुखातून श्रवण करण्याची संधी मिळत असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. नगरमधील जैन समाजातील विविध गोत्रांतील परिवार या धार्मिक उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे दररोज जैन समाजातील दोन ते तीन गोत्रांतील परिवार एकत्र येऊन उत्तराध्ययन सूत्राच्या पवित्र ग्रंथपालखीची जबाबदारी स्वीकारतात. त्या त्या गोत्रांतील अहिल्यानगर शहरातील सर्व परिवार सदस्य लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत एकत्र येऊन मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि थाटामाटात आनंदधाम येथून आनंद समवशरणपर्यंत ग्रंथपालखी घेऊन जातात. या उपक्रमातून जैन समाजातील एकोपा, सामूहिक श्रद्धा, गुरुभक्ती आणि धार्मिक संस्कारांचे सुंदर दर्शन घडते.

याच धार्मिक उपक्रमाचा एक भाग म्हणून आज बोरा व लोढा परिवारातील सर्व सदस्यांनी एकत्र येत उत्तराध्ययन सूत्राच्या पवित्र ग्रंथाची शोभायात्रा आयोजित केली. आनंदधाम येथून बँड–बाजांच्या गजरात, भगवान महावीर स्वामींच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात उत्तराध्ययन सूत्राचा पवित्र ग्रंथ पालखीत विराजमान करून ग्रंथपालखी आनंद समवशरण येथे नेण्यात आली. या शोभायात्रेत बोरा व लोढा परिवारातील सदस्य लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सहभागी झाले होते.

### २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत वाचन

यावेळी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांच्यासह राजकुमार बोरा, भूषण बोरा, रमेश बोरा, अजित बोरा, संजय बोरा, अजय बोरा, ईश्वर बोरा, प्रणिल बोरा, विकी बोरा, संदीप बोरा, संतोष बोरा आदी तसेच लोढा परिवारातील श्रीमती स्मिता विरेंद्र लोढा, महेंद्र लोढा आणि अन्य सदस्य उपस्थित होते. संपूर्ण शोभायात्रे दरम्यान भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ग्रंथपालखीचे दर्शन घेण्यासाठी आणि या उपक्रमात सहभागी होण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. धार्मिक परंपरा जपत सामूहिक श्रद्धा, एकोपा आणि गुरुभक्तीचा आदर्श या निमित्ताने अनुभवायला मिळाला. २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या उत्तराध्ययन सूत्र वाचन उपक्रमामुळे अहिल्यानगरमध्ये आध्यात्मिक वातावरण अधिक मंगलमय झाले आहे. गुरुदेवांच्या मार्गदर्शनातून उत्तराध्ययन सूत्रातील तत्त्वज्ञान समजून घेण्याची आणि ते दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची प्रेरणा या २१ दिवसांचा आध्यात्मिक उपक्रमातून भाविकांना मिळत आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

### सुख – दुःख स्व–कर्माचे फळ

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




अध्यात्म रामायण सांगते. असा कोण आहे जगात उदार, की जो बसला आहे दारात करायला सुखाची खैरात? कुणी कुणाला सुख द्यायला आले नाही जन्माला. तसेच स्वत:चेच दु:ख निवारायला नाकी नऊ येत आहेत. इतरांच्या मग कुठे येते अभिनव कल्पना त्यांना मनात दु:ख द्यायला तुम्हाला. कोणी दुसऱ्याला सुख वाटत नाही, तसेच दु:खही द्यावेसे कुणाला वाटत नाही. तुमचा कर्तृत्वांचा अभिमानमात्र घडवितो दुसऱ्याचा अपमान आणि नकळत टाकतो तुमच्या पदरात दुःखाचे दान, सुखदुःख फळ आपल्याच वायफळ करणीचे प्रताप.

लोक देवाशी दोस्ती करतात. म्हणतात, देवा, संसाराचा ताप घालव. माझं दुःख दूर कर. मनात असली कुठलीही वासना न बाळगता निखळ सुखाचे दान देणारी, निर्मळ मनाने केलेली सद्गुणाची संगत आणि निष्काम कर्माची पंगत देते सदैव आनंद आणि केवळ आनंद.

तुकाराम महाराज म्हणतात.

सुखाचे व्यवहारी सुखलाभ झाला। आनंद कोंदला मागे पुढे ।।

देवाशी सलगीच्या मोबदल्यात सुखच मागितले फक्त. कारण संसारसुखात नव्हतो आसक्त, म्हणूनच संसारातील दुःखापासूनच सोडव मला, असं नाही म्हटलं. मनात केवळ सुखाचाच विचार. मुखात केवळ सुखाचेच मागणे. टाळमृदंगाच्या हरिनामगजरात केवळ सुखच उपभोगणे. म्हणूनच कालही होते सुख, उद्याही तेच मिळणार. आज जसे मिळाले तसे. निर्मळ मनाने कर्म करा. सदैव सुख येई घरा.

एका बलवान अधिकाऱ्याच्या शेजारी एक सुतार डावीकडे राहत होता. तर दुसरा लोहार उजवीकडे. सुतार आणि लोहार रात्रंदिवस काम करीत.

सारखे ठोककाम व घणांचे आघात अधिकाऱ्याच्या झोपेचा करीत घात. अधिकारी चिडला. दोघांनाही बोलावून म्हणाला, तत्काळ घर बदला. मला त्रास होतोय, तो टाळा, सुतार व लोहार होय सरकार, म्हणून झाले. पसार.

आठ दिवसानंतर अधिकारी भयानक चिडला. सुतार आणि लोहार यांच्या कटकटीचा त्रास नव्हता संपला. त्याने सुतार आणि लोहाराला विचारले, काय रे, घरं बदलली नाहीत ? ते दोघेही म्हणाले, बदलली सरकार मग आवाजांचा त्रास का होतोय पूर्वीसारखाच ?

लोहार म्हणाला, मी घर बदललं, सुताराचं घेतलं. सुतार म्हणाला, मीही तुमच्या आज्ञेप्रमाणे घर बदललं. लोहाराचं घेतलं.

अधिकाऱ्यानं दोघांनाही फसवाफसवीबद्दल कैदेत टाकलं. दोघांनाही स्वत:च्याच बनवाबनवीच्या कर्मापायी दुःख प्राप्त झालं.

**– किशोर गांधी**

**फूलों ने अमृत का जाम भेजा है ,**
**सूरज ने गगन से सलाम भेजा है,**
**बधाई हो ऋषीवर जनमदिन की,**
**तहे दिल से यह पैगाम भेजा है।**

सूर्याची पूजा केवळ त्याच्याकडे प्रकाश आहे म्हणून केली जात नाही, तर तो संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो म्हणून केली जाते. नदीला माता केवळ तिच्याकडे पाणी आहे म्हणून म्हटले जात नाही, तर ती संपूर्ण विश्वाची तहान भागवते, सर्वांची तृष्णा शांत करते म्हणून तिला माता म्हटले जाते.

वृक्षाची प्रशंसा यासाठी केली जाते की, तो स्वतःसाठी फळे ठेवत नाही, स्वतः खात नाही, तर ती सर्वांना वाटतो. तसेच तो सर्व वाटसरूंना सावली देतो. म्हणूनच वृक्षालाही नमन केले जाते.

आज अशाच दिव्य–भव्य सूर्याला, परोपकारी मातेला आणि सावली देणाऱ्या कल्पवृक्षाला नमन, अभिनंदन आणि अभिवादन!

ज्यांचा उदय, ज्यांचा जन्म आजच्या या शुभदिनी महाराष्ट्रातील छोट्याशा देहात, घोडेगाव येथे १९५७ साली झाला.

म्हणतात, कागद आपल्या नशिबाने उडतो, पण पतंग आपल्या दोरीच्या कुवतीने उंच भरारी घेतो.

त्यांच्या जीवनाच्या दोरीचे पहिले टोक होते वीरमाता चंपाबाई देसर्डा आणि पिताजी दगडूलालजी देसर्डा.

अशी पतंग त्यांनी हातात घेतली, असे उच्च संस्कार दिले की ती पतंग सतत उंच आणि उंच भरारी घेत गेली. आणि या सूर्याचे नामकरण झाले – प्रकाश. जो खऱ्या अर्थाने प्रकाशयात्री बनून राहिला.

पितृ देवो भवः।

पिताजी देवदूत बनून त्यांच्या जीवनात आले आणि अनंत उपकार करून त्या देवदूताने प्रकाशाला भगवंताच्या हाती सोपवले.

आचार्य भगवंत पू. आनंदऋषीजी म.सा. संतच नव्हे, तर भगवंतच आहेत.

बेटा! हा कानमंत्र देऊन त्यांनी प्रकाशाच्या जीवनाचे संपूर्ण तंत्रच बदलून टाकले.

जसे मीराच्या आईने तिला कृष्ण दिले, शबरीने न पाहताही रामाला स्वीकारले, तसेच बालक प्रकाशाची नजर आपल्या गुरूंमध्ये भगवंताचे रूप पाहू लागली. त्यांचे कान भगवंताचे वचन ऐकू लागले आणि त्यांचे मन गुरु साक्षात परब्रह्म आहेत, या अनुभूतीत डुंबू लागले.

प्रत्येक दगड मूर्ती बनू शकत नाही,

प्रत्येक बीज कल्पवृक्ष बनू शकत नाही, पावसाचा प्रत्येक थेंब मोती बनू शकत नाही.

त्या दगडाला, त्या बीजाला, त्या थेंबाला

# शरदपोर्णिमेचा प्रकाशपर्व



योग्य वेळी योग्य हात मिळाले, तरच त्याला त्याचे खरे स्वरूप प्राप्त होऊ शकते.

नन्हा बालक प्रकाश – त्याची चेतना उत्कृष्ट होतीच. अनंत उपकार करणाऱ्या पिताजींनी त्याला अशा हातांमध्ये सोपवले, ज्यांनी आपल्या नजरेने, आपल्या दिव्य स्पर्शाने आणि अनंत वात्सल्याने त्याची मूर्ती घडवली, त्याला कल्पवृक्ष बनवले, अनमोल मोती बनवले.

ज्याला प्राप्त करून आज संपूर्ण विश्व संपन्न आणि समृद्ध होत आहे – श्रद्धेने संपन्न होत आहे.

जे प्रभूचे खरे स्वरूप उलगडून जन–मनामध्ये अनोखी प्रभुभक्ती जागवत आहेत.

त्यांचे ज्ञान, त्यांची साधना त्यांनी केवळ स्वतःपुरती ठेवली नाही. परमात्म्याच्या प्रत्येक सूत्रातून जगातील प्रत्येक व्यक्तीच्या प्रत्येक समस्येचे समाधान ते देत आहेत.

नात्यांची सुरुवात दांपत्य जीवनापासून होते. तिथूनच साधना देऊन त्यांना एकमेकांमध्ये प्रभू पाहायला शिकवतात. त्यानंतर त्यांना श्रेष्ठ माता–पिता होण्याची पद्धत आणि सिद्धांत समजावून सांगतात. कारण माता–पिता देव बनले, तर संतती देवत्वाची संपत्ती घेऊनच जन्माला येते.

जीवाची यात्रा गर्भापासून सुरु होते. म्हणूनच अर्हम् गर्भसंस्काराच्या माध्यमातून साधना देऊन, तीर्थंकरांच्या श्रेष्ठतम ऊर्जेने जीवन संपन्न करून, जीवनयात्रेला तीर्थयात्रा बनवतात.

भगवान महावीरांनी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आणि प्रत्येक पैलूवर जीवन घडवण्याची आणि मृत्यूला निर्वाण बनवण्याची कला सांगितली आहे. तीच कला अर्हम् विज्ञाच्या कार्यक्रमातून शिकवली जात आहे.

हे प्रत्येक कार्यक्रम वाचून किंवा शिकून तयार झालेले कार्यक्रम नाहीत, तर पीडेतून जन्मलेले कार्यक्रम आहेत.

जगाच्या वेदनेने संवेदित होऊन, प्रसूतीच्या वेदनेतून प्रस्फुटित झालेले हे वरदान आहेत.

सध्या अहिल्यानगरमध्ये चातुर्मासाचा शिखर पर्व सुरू आहे. आपल्या श्वासांमध्ये सामावलेल्या गुरुदेवांच्या पुण्यभूमीत हा पुण्यपुरुष आपला प्रत्येक क्षण, आपली संपूर्ण ऊर्जा आणि सर्व प्रबोधन केवळ या एकाच उद्देशाने देत आहेत की, माझ्या गुरुदेवांची मेहनत सफल व्हावी – सार्थक व्हावी.

समाजाचे विघटन संघटनामध्ये परिवर्तित व्हावे, हा त्यांचा मंगल प्रयत्न आहे. त्यांचा हा मंगल प्रयत्न प्रत्येक युवा पिढीसाठी आहे, जेणेकरून ती दुःखाने दुःखी होऊ नये.

अनेक वेळा मनुष्य दुःखाने खचून जातो. दुःखाने खचण्याऐवजी आणि हार मानण्याऐवजी, दुःख आणि संकटांनाच आपली ताकद कसे बनवायचे, याची कला ते येणाऱ्या पिढीला शिकवत आहेत.

त्या पिढीला नात्यांसोबत योग्य पद्धतीने जगायला शिकवत आहेत. आपण आपल्या नात्यांसाठी वेळ काढला नाही, तर वेळ आपल्यामधूनच नाते काढून टाकतो. म्हणून वेळ असतानाच, नाती गुंतागुंतीची होण्यापूर्वी ती कशी सोडवता येतील, हे ते शिकवत आहेत.

या समर्पण चातुर्मासामध्ये त्यांचे मनःपूर्वक भाव आणि सहज समर्पण पाहिले, तेव्हा असे वाटले की अशी धवल, उज्ज्वल आणि निर्मळ भावधारा त्यांच्यातून वाहत आहे, जणू एखाद्या बासरीतून शुद्ध, मधुर आणि निर्मळ स्वर उमटत आहेत.

ते गुरुचरणांमध्ये असे समरस होतात, जसे एखादी सरिता सागरात जाऊन विलीन होते.

असे हे वातावरण आता २० ऑक्टोबरपासून चैतन्यमय प्रकाशाच्या अद्भुत झोताने, श्रीमद् उत्तराध्ययन श्रुतदेवाच्या रूपाने बरसणार आहे.

उजेडाचा, प्रकाशाचा आणि पवित्रतेचा समारंभ संपन्न होणार आहे.

त्या भव्य पारायणामध्ये त्यांच्या चैतन्यमय वचनांचा स्पर्श प्रत्येक भावी आत्म्याला प्रभूची प्रचिती करून देईल.

अशा या अद्भुत योगी महाराष्ट्र केसरी, अर्हम विज्ञा प्रणेता–उपाध्याय पु श्री प्रवीणऋषीजी महाराज च्या जन्मदिनाच्या अनंत अनंत शुभेच्छा!

आपल्यामध्ये शिवनेरी किल्ल्याची श्रीमंती, रायगडाची भव्यता, पुरंदरची दिव्यता, सिंहगडाची शौर्यता आणि सह्याद्रीची उंची आहे.

आपण जिनशासनाच्या भावी आत्म्यांचे छत्रपती आहात.

आपल्याला खूप खूप बधाई!

**– आनंद उपासीका**
**साध्वी ओजसदर्शना**



तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तसेच मुलींचा हॉलीबॉल संघ तालुकास्तरीय स्पर्धेत विजयी होऊन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

# माऊंट सिनायच्या मुली क्रिकेट, हॉलीबॉल स्पर्धेत चमकल्या

नगर – जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर व नगर तालुका क्रीडा समिती यांच्या वतीने श्रीराम विद्यालय, पिंपळगाव माळवी येथे आयोजित तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या मुलींच्या संघाने दमदार कामगिरी केली आहे.

१७ वर्षे वयोगटातील मुलींच्या गटात माऊंट सिनायच्या संघाने अंतिम सामन्यात ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूलच्या संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले असून, संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कर्णधार साक्षी राठोड, शिफा शेख, निर्मयी झोडगे, अक्षदा उबाळे, श्रुष्टी पोकळे व सुकन्या वायकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

तसेच नगर तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या सतरा वर्ष वयोगटातील मुलींचा हॉलीबॉल संघ तालुकास्तरीय स्पर्धेत विजयी होऊन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या संघात साक्षी राठोड, रूतूजा म्हस्के, निर्मयी झोडगे, सुकन्या वायकर, श्रुष्टी पोकळे, श्रुष्टी कल्हापूरे व श्रावणी म्हस्के यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे आत्तापर्यंत झालेल्या विविध क्रीडा प्रकारात विद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी केली असून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पुढील विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. प्रणव बोरूडे– बुद्धिबळ, यश हिवाळे व पुर्वी कुटे– तायक्वांदो, दक्ष अंकुश व निर्मयी झोडगे – थाळीफेक आणि शिफा शेख – थाळी फेक व गोळा फेक.

या यशाबद्दल तालुका क्रिडा समितीचे अध्यक्ष महेंद्र हिंगे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री खरात, पर्यवेक्षिका उज्वला पंडित व सविता पाटोळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना क्रीडा शिक्षक किशोर उबाळे व मुजाहिद शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

# हसत–खेळत गणित शिकूया–पुस्तकांचे अनावरण


मेहेर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका अनुरिता झगडे लिखित हसत–खेळत गणित शिकूया या पुस्तकांचे अनावरण हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अनंत फडणीस व शाळेचे चेअरमन जगदीश झालानी यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – हिंद सेवा मंडळ संचलित, मेहेर इंग्लिश स्कूल, पटवर्धन चौक येथील शाळेच्या मुख्याध्यापिका अनुरिता झगडे लिखित हसत– खेळत गणित शिकूया अशा सर्व माध्यमांच्या शाळांतील प्राथमिकच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त गणित पुस्तकांचे अनावरण हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अनंत फडणीस व शाळेचे चेअरमन जगदीश झालानी यांच्या हस्ते व शाळेतील सर्व शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शाळेचे चेअरमन झालानी यांनी या पुस्तकाचे कौतुक करताना सांगितले की, खरे पाहता सर्वच माध्यमांच्या शाळांमध्ये लहान मुलांना अवघड वाटणारा गणित विषय या पुस्तकामुळे अतिशय सोपा वाटेल. यामध्ये चित्रे, रंगभरण, कोडे सोडवणे, पाढे तयार करणे याद्वारे गुणाकाराच्या वेगवेगळ्या पद्धती अनेक उदाहरणाद्वारे अतिशय सोप्या पद्धतीने मांडून केले असल्याने, यामुळे मुलांमधील गणिताविषयीची भीती कमी होईल.

यासाठी झगडे यांनी अत्यंत मेहनतीने फक्त विद्यार्थ्यांचा विचार करून ह्या पुस्तकांची निर्मिती केली आहे. फक्त २४ तासांमध्ये पुस्तक निर्माण केले आहे हे विशेष. यामध्ये त्यांनी कोणताही बडेजावपणा न करता अत्यंत मेहनत व जिद्दीने या पुस्तकांचे लेखन केले आहे. विशेष बाब म्हणजे या पुस्तकामध्ये त्यांनी कुठेही स्वतः च्या नावाचा उल्लेख न करता शाळेचेच नाव वापरले आहे, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा असल्याचे झालानी म्हणाले.


जागतिक पोलिओ निर्मूलन दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊनच्या वतीने केडगावमधील ओंकारनगर येथील महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली.

# ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी काढली पोलिओ जनजागृती रॅली

नगर – जागतिक पोलिओ निर्मूलन दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊनच्या वतीने केडगावमधील ओंकारनगर येथील महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी तीन गट बनवण्यात आले होते. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना क्लबच्या वतीने बक्षीस वितरण करण्यात आले.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊनचे अध्यक्ष हेमंत कराळे, सेक्रेटरी मधुर बागायत, मर्लिन एलिशा, तुषार देशमुख, डॉ. संकेत अडाळे, डॉ.साक्षी अडाळे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे उपस्थित होत्या.

मुख्याध्यापक कबाडी यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. रोटरीचे अध्यक्ष हेमंत कराळे, सेक्रेटरी बागायत यांनी यावेळी आपल्या मनोगतातून शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. तसेच ओंकारनगर शाळेला आवश्यक विविध सुविधा पुरविण्याचे आश्वासन दिले. पाहुण्यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला. सूत्रसंचालन मुख्याध्यापक कबाडी यांनी केले. सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी आभार मानले.

# साठ बालकलाकारांच्या नृत्याविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध; नाच गं घुमाला प्रतिसाद

### गरबा, गोंधळ, जोगवा आणि श्रीकृष्णाच्या रासलीलेतून साकारले नवरात्रीचे नवरंग



नगर – नृत्यझंकार डान्स अकॅडमीच्या वतीने नवरंग नवरात्री या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक धार्मिक संस्कृती, भारतीय लोककला, स्त्रीशक्ती आणि आधुनिक सामाजिक संकल्पना यांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. तब्बल ६० बालकलाकारांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. देवीची विविध रूपे, कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व, श्रीकृष्णाची रासलीला, महाराष्ट्राची पारंपरिक लोककला आणि गुजरातच्या गरब्याचे देखणे सादरीकरण यामुळे कार्यक्रमाला रंगत आली. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सीमा ढवळे, भूषण भंडारी, डॉ. ओंकार कोकाटे, राजकुमार गुरुनानी, पालक प्रतिनिधी स्नेहल जामगावकर आणि नृत्यझंकारच्या संचालिका प्रिया ओगले–जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

कार्यक्रमात देवीच्या पूजनीय रूपांचे दर्शन घडविणाऱ्या नृत्यांसह कोजागिरी पौर्णिमेचे वैशिष्ट्य आणि श्रीकृष्णाच्या रासलीलेचे सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्राच्या पारंपरिक जोगवा आणि गोंधळ या लोककलाही बालकलाकारांनी प्रभावीपणे सादर केल्या. त्यांच्या सादरीकरणातून भक्ती, परंपरा आणि संस्कारांचे दर्शन घडले. जणू आपण देवीच्या मंदिरातच उपस्थित आहोत, असा अनुभव प्रेक्षकांना आला. गुजरातच्या गरबा नृत्याचे आकर्षक आणि देखणे सादरीकरणही या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. आजच्या धकाधकीच्या जीवनात महिला घर, कुटुंब आणि कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळत प्रत्येक आघाडीवर समर्थपणे उभ्या असतात. आधुनिक स्त्रीची ही जिद्द, संघर्ष आणि सामर्थ्य नाच गं घुमा या नृत्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आले. या सादरीकरणाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेकांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात बालकलाकारांना दाद दिली.

संपूर्ण कार्यक्रमात पारंपरिकता, धार्मिकता आणि संस्कारक्षम विचारांना आधुनिकतेची जोड देण्यात आली. विविध नृत्यप्रकारांतून सामाजिक संकल्पना मांडत प्रेक्षकांना सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. राजकुमार सहदेव आणि नीला गडाख यांनी देवीची स्तुती गाऊन कार्यक्रमात भक्तिमय वातावरण निर्माण केले.

नृत्य क्षेत्रात राज्यस्तरीय बक्षिसे मिळविणाऱ्या मुलींचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी पाहुण्यांनी आहार, बालमानसशास्त्र आणि नृत्याचा आरोग्याशी असलेला संबंध या विषयांवर मार्गदर्शन केले.

नृत्य ही केवळ मनोरंजनाची कला नसून शारीरिक आरोग्य, मानसिक आनंद आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठीही महत्त्वाची असल्याचा संदेश या मार्गदर्शनातून देण्यात आला. सूत्रसंचालन वर्षा पाठक– रोडे यांनी केले.

# संत साहित्य जगण्याची उमेद देणारा सर्वात मोठा उर्जेचा स्त्रोत

## पोपटराब पवार यांचे प्रतिपादन; संत साहित्य संमेलनात संतमंडळींची मांदियाळी: भक्तीमय वातावरणात उद्‌घाटन

नगर – माऊली ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी आणि पसायदानाने संपूर्ण जगाचं कल्याण मागितलं आहे तर प्राचीन भारतीय परंपरेने वसुधैव कुटुंबकम शिकवण दिली आहे. संत ज्ञानेश्वर, जगद्गुरु तुकाराम महाराज व सर्व संतांनी आपल्या ग्रंथातून आपल्याला आदर्श जीवनशैली सांगितली आहे. महाराष्ट्राच्या महान संत परंपरेने, संत साहित्याने फार मोठी आदर्शवत विचारधारा आपल्या समोर ठेवली आहे. हे संत साहित्य मानवाला जगण्यासाठी उमेद देणारं सर्वात मोठं उर्जेचा स्त्रोत आहेत. मात्र या महान ग्रंथांनी दिलेले संदेश व शिकवण मनुष्य विसरला असून निसर्गाशी दूराव घेत पैशाच्या मागे लागला आहे. भविष्यातील वाटचालीसाठी ही संत परंपरा व मानवतावाद टिकवणे आवश्यक असून संतांच्या विचारांवरच कृती करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराब पवार यांनी केले.

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या आर्थिक सहयोगातून व नगरच्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने नगरमध्ये प्रथम झालेल्या जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन माउली सभागृहातील संजीवन व्यासपीठावर तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत व पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते हरिनामाच्या जयघोषात झाले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतीश मुळे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर, सचिव संजय खेले, जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर, साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ.राजेश गायकवाड व बी.जी.शेखर पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे, पत्रकार प्राचार्य प्रकाश टाकळकर, अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष के.डी.धुमाळ, संमेलनाचे सहसचिव राजेंद्र गाडगीळ, सह स्वागताध्यक्ष प्राचार्या सुनील पंडित, कार्यवाह दत्तात्रेय भालेराव आदींसह जिल्ह्यातून आलेले विविध क्षेत्रातील नागरिक, वारकरी व श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाचे सर्व साधक उपस्थित होते. दोन दिवसीय या संत साहित्य संमेलनात जिल्ह्यातील संत, हभप महाराजांची मांदियाळी सभागृहात व व्यासपीठावर जमली.



नगरमध्ये झालेल्या संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना पद्मश्री पोपटराव पवार. समवेत स्वागताध्यक्ष सतीश मुळे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर, सचिव संजय खेले, डॉ. राजा ठाकूर, डॉ.राजेश गायकवाड, प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे, प्रा. प्रकाश टाकळकर, के.डी.धुमाळ, राजेंद्र गाडगीळ, प्राचार्या सुनील पंडित आदी. यावेळी मार्गदर्शन करताना तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज.

महंत आदिनाथ शास्त्री महाराज म्हणाले, श्रद्धेने पाहिल्यावर सर्वांमध्ये परमेश्वर दिसतो तर श्रद्धा नसेल तर देवातही देव दिसत नाही. त्यामुळे जीवनात व परमार्थात श्रद्धेला व भावनेला फार महत्व आहे. कोणाचाही मत्सर न करता कायम चांगले, सत्य व कमी बोलणे ही तपस्चर्याच आहे, असा संदेश देऊन काही घटनाचे दाखले दिले.

प्रास्ताविक डॉ.दिलीप धनेश्वर यांनी तर, सतीश मुळे यांनी जिल्ह्यातील वैभवशाली संत परंपरेचा व कार्याचा आढावा घेऊन स्वागत केले.

उद्घाटन सत्रात नगरच्या श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाद्वारे निर्मित श्री ज्ञानेश्वरी चिंतन खंड १– तत्त्वज्ञान प्रबोध व खंड २ – जीवन प्रबोध या बृहद् ग्रंथाचे स्वागत तसेच विविध पुरस्कारांनी पुरस्कार्थींना सन्मानित करण्यात आले. तसेच राज्यस्तरीय विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

सूत्रसंचालन अनिल सोमणी यांनी केले. सहस्वागताध्यक्ष प्रा.सुनील पंडित यांनी आभार मानले. श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाचे डॉ. राजू रिकल, प्रा. मीरा पठारे, प्रा. भीमराज पठारे, प्रा. डॉ.मच्छिंद्र मालुंजकर, डॉ. स्वप्नील सहस्रबुद्धे, ज्ञानेश्वर दुधाडे, आदींनी कार्यक्रमांचे नियोजन केले. संत साहित्य संमेलन स्थळा संतसाहित्य नगरी असे नाव देण्यात आले असून मुख्य प्रवेशद्वारास परमानंद महाद्वार, संजीवन व्यासपीठ संत शेख महंमद राजद्वार, संत दासगणु ग्रंथालय व संतनिळोबाराय, संत महिपती महाराज, संतमुक्ताई, संत निवृत्तीनाथ आदींचे नावे विविध ठकाणी देण्यात आले आहेत.



शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

# जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत समर्थ विद्यामंदिरचा संघ प्रथम

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या कामगिरीच्या जोरावर संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. संघातील श्री रोडे, श्रेयस हापसे, साई फिरोदे, आण्विक कासार, मिनेश ठाकूर, शिवम नजन, आयुष राठोड, पियुष राठोड, सात्विक शिंदे, आयुष सुतार, साई रोडे, आयुष शिंदे आदी खेळाडूंनी सांघिक कामगिरीच्या जोरावर संघाला विजेतेपद मिळवून दिले.

या सर्व खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा विभागप्रमुख पी. पी. लोंढे यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले. खेळाडूंनी केलेल्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि मेहनतीचे हे यश असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच शालेय समितीचे अध्यक्ष किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या वसुधा जोशी, पर्यवेक्षिका शारदा होशिंग, संघटनेचे सचिव विवेक सूर्यवंशी, प्रियंका बांगर, बोराजी पथवे यांच्यासह प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# फेब इंडियन एक्झिबिशनमध्ये दिवाळी खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी



दिवाळीच्या सणासुदीची खरेदी आणि त्यासोबत बंपर बक्षिसे जिंकण्याची संधी मिळत असल्याने गुलमोहर रोड येथील फेब इंडियन हँडलूम अँड हँडीक्राफ्ट आर्ट अँड क्राफ्ट एक्झिबिशनमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. या उत्साहात रविवारी झालेल्या लकी ड्रॉमध्ये नीता पोटे या मिक्सर ग्राइंडरच्या भाग्यवान विजेत्या ठरल्या.

## लॅकी ड्रॉलाही चांगला प्रतिसाद; नीता पोटे ठरल्या मिक्सरच्या विजेत्या

नगर – दिवाळीच्या सणासुदीची खरेदी आणि त्यासोबत बंपर बक्षिसे जिंकण्याची संधी मिळत असल्याने पारिजात चौक, तांबटकर मळा, गुलमोहर रोड येथील फेब इंडियन हँडलूम अँड हँडीक्राफ्ट आर्ट अँड क्राफ्ट एक्झिबिशनमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. विविध वस्तूंची खरेदी करण्यासोबतच लकी ड्रॉमध्ये आपले नाव नोंदवण्यासाठी ग्राहकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या उत्साहात रविवारी झालेल्या लकी ड्रॉमध्ये नीता पोटे या मिक्सर ग्राइंडरच्या भाग्यवान विजेत्या ठरल्या. दिवाळीच्या खरेदीसोबत बक्षीस मिळाल्याने त्यांच्या आनंदात भर पडली असून, या बक्षिसामुळे प्रदर्शनातील लकी ड्रॉची चर्चा आणखी रंगली आहे.

या प्रदर्शनातील कोणत्याही स्टॉलवरून १,९९९ पेक्षा अधिक खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉमध्ये सहभागी होता येते. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये लकी ड्रॉमध्ये आपले नाव नोंदवण्याची विशेष उत्सुकता आहे. लकी ड्रॉमध्ये ४३ इंची कलर टीव्ही, वॉशिंग मशीन, रेफ्रिजरेटर यांसारखी बंपर बक्षिसे जिंकण्याची संधी आहे. तसेच दररोज मिक्सर ग्राइंडर, कुकर, एअर कूलरसह विविध आकर्षक बक्षिसे दिली जात आहेत. त्यामुळे खरेदीसोबत नशीब आजमावण्यासाठी ग्राहकांची गर्दी वाढत आहे.

### १,९९९ पेक्षा अधिक खरेदीवर लॅकी ड्रॉ

लकी ड्रॉमध्ये मिक्सर ग्राइंडर जिंकलेल्या नीता पोटे यांनी आनंद व्यक्त करत, दिवाळीच्या खरेदीसाठी प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर लकी ड्रॉमध्ये बक्षीस मिळाल्याने खरेदीचा आनंद द्विगुणित झाल्याचे सांगितले. प्रदर्शनाचे संचालक अजय गुप्ता यांनी सांगितले की, दिवाळीची खरेदी केली असेल तरी अजूनही प्रदर्शनाला भेट देऊन खरेदी करता येईल. ज्यांची दिवाळीची शॉपिंग बाकी आहे, त्यांनी येथे खरेदी करावी. १,९९९ पेक्षा अधिक खरेदीवर लकी ड्रॉमध्ये नाव नोंदवता येते. खरेदीसोबत भरपूर आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी नागरिकांनी साधावी, असे आवाहन त्यांनी केले.

### देशभरातील कला, हस्तकला आणि वस्त्रांची रेलचेल

प्रदर्शनात चंदेरी व पटोरा साड्या, बनारसी साड्या व ड्रेस मटेरियल, पश्चिम बंगालच्या पॅचवर्क साड्या, लखनवी चिकन, कोटा सिल्क, काश्मिरी सूट, पश्मिना शाल, जयपुरी बेडशीट्स, राजस्थानी मोजरी, भदोई कार्पेट, ज्वेलरी, खादी शर्ट, पुस्तके तसेच विविध गृहउपयोगी वस्तू उपलब्ध आहेत. सकाळी ११ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रदर्शन सुरू असून प्रवेश व पार्किंग मोफत आहे. दिवाळीची खरेदी करण्यासोबत लकी ड्रॉमध्ये आपले नाव नोंदवून बंपर बक्षिसे जिंकण्याची संधी साधण्यासाठी नागरिकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नगरमध्ये २७ ऑक्टोबर रोजी ‘स्वर दीपावली संगीत कार्यक्रम’

नगर – दिवाळीनिमित्त दिव्यदृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आयोजित स्वरसृष्टी संगीत मंच यांच्या वतीने स्वर दीपावली संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी, हिंदी, भक्तिगीते, गझल तसेच चित्रपट गीतांचा सुरेल आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. हा कार्यक्रम २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सांस्कृतिक सभागृह अहिल्यानगर येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख प्रायोजक म्हणून डॉ.दमन काशीद यांच्यासह विविध संस्था व उद्योजकांनी सहकार्य केले आहे. आयोजकांनी अहिल्यानगर व परिसरातील नागरिक, संगीतप्रेमी, सामाजिक संस्था, युवक–युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांनी या प्रेरणादायी कार्यक्रमास कुटुंबासह उपस्थित राहून दिव्यांग कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले आहे.



उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना भक्ती यात्रा उत्साहात पार पडली. यात गांधी परिवारातील आबालवृद्ध भाविकांनी सहभाग घेतला.

# आनंदधाम परिसरात उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना भक्ती यात्रा उत्साहात

## गांधी परिवारातील आबालवृद्ध भाविकांचा सहभाग

नगर – आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे उपाध्याय प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास भाविकांच्या उत्साहात साजरा होत आहे. यात तीर्थंकर निर्वाण कल्याणक उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना सुरू आहे. यानिमित्त रविवारी सकाळी आराधना भक्ती यात्रा काढण्यात आली. गांधी परिवार या यात्रेचे लाभार्थी होता. आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान किशोर गांधी जैन ध्वज घेऊन यात्रेच्या अग्रभागी होता. यानंतर पवित्र उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना ग्रंथ, नवकार कलशधारी श्राविका, तीर्थंकरांचा संदेश देणारे फलक घेतलेले श्रावक, श्राविका सहभागी झाले होते. भगवान महावीरांचा जयकारा करत जिनेश्वरीचा, जैन परंपरांचा जागर केला. महिला, भगिनींनी क्रिम, केसरी, लाल रंगाच्या साडी तर पुरुषांनी पांढऱ्या रंगाची वेशभूषा परिधान केली होती.

यावेळी भक्ती यात्रेचे लाभार्थी गांधी गोत्र परिवारातील आबालवृद्ध सदस्य तसेच समर्पण चातुर्मास कमिटीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. माजी खा. दिलीप गांधी यांच्या निवासस्थानापासून निघालेल्या या यात्रेचा समारोप आनंद तीर्थ समवशरण येथे झाला. उत्तराध्यायन श्रुतदेव आराधना तीर्थंकर भगवान महावीर यांची निर्वाण कल्याणक अंतिम देशना आहे. तीर्थंकरांनी २६०० वर्षांपूर्वी आदर्श जीवन पद्धतीचे सूत्र यात सांगितले होते. आजच्या काळातील सर्व समस्यांची उत्तरे यात मिळतात. प्रविणऋषीजी महाराज यांच्या मुखारविंदातून ही भक्ती गाथा ऐकण्यासाठी भाविक उत्साहाने एकत्र येत आहेत. दररोज सकाळी गाथा सुरू होण्यापूर्वी लाभार्थी परिवार भक्ती यात्रा काढतात. गांधी परिवाराने भक्तीभावाने ही यात्रा काढून भक्तीचा जागर केला.

प्रविणऋषीजी महाराज यांनी सुंदर आयोजनाबद्दल कौतुक केले. कार्यक्रमानंतर नवकारसीची व्यवस्था करण्यात आली होती.

## जाहीर प्रगटनास उत्तर

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनास उत्तराद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीबाबत नवा मराठा या वर्तमानपत्रात दि. २०.१०.२०२६ रोजी शेख इम्रान अयाज रा. दक्षिणमुखी हनुमान मंदिर जवळ. सर्जेपुरा, अहमदनगर यांच्यातर्फे ॲड. समीर वखारे यांनी प्रसिद्ध केलेले जाहीर प्रगटन आमचे अशील हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी यांच्या वाचन्यात आली आहे. सदरच्या जाहीर प्रगटनामध्ये केलेले कथन खोटे व लबाडीचे असून बेकायदेशीर असे आहे व आमच्या आशील यांना मुळीच मान्य व कबूल नाही.

मिळकत सि.स.क्र. ६४४८ एकुण क्षेत्र २३६.६ चौ.मी. ही सुरुवातीस शेख इमाम मजीद व शेख यासिन मजीद तसेच मयत शेख महेबूब मोहम्मद व इतर यांच्या मालकी वहिवाटीची मिळकत होती. तदनंतर सदरची मिळकत सौ. नजमा मोहम्मद शेख यांनी मिळकतीचे मालक शेख यासीन शेख मजीद यांच्या कडून त्यांचा कायदेशीर असलेला हिस्सा क्षेत्र ६९.७० चौ.मी. हा दि.२०/०२/१९९२ रोजी खरेदी केला होता तसेच लियाकत मोहम्मद शेख व समीर मोहम्मद शेख यांनी शेख इमाम शेख मजीद यांच्या कडून त्यांचा असलेला हिस्सा क्षेत्र ६९.७० चौ.मी. तसेच लियाकत मोहम्मद शेख व समीर मोहम्मद शेख यांनी फकरुन्निसा शेख महेबूब व इतर यांच्यापासून त्यांचा असलेला हिस्सा सन २००७ रोजी रजि. खरेदीखताच्या दस्ताअन्वये खरेदीचा संपुर्ण मोबदला देऊन खरेदीखत करून घेतलेले होते व आहे व त्यानुसार मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्कासदरी सौ. नजमा मोहम्मद शेख, लियाकत मोहम्मद शेख समीर मोहम्मद शेख यांचे नाव खरेदीखता अन्वये लागलेले होते व आहे.

सौ. नजमा मोहम्मद शेख यांच्या मृत्यूनंतर मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्कासदरी त्यांचे कायदेशीर वारस म्हणून मोहम्मद इमाम शेख, लियाकत शेख, समीर मोहम्मद शेख व तबस्सुम फारुक शेख यांचे नाव लागलंल होते व आहे

सन २०१४ मध्ये शेख मोहम्मद इमाम व इतर तीन यांनी मिळकतीपैकी ६९.७० चौ.मी. क्षेत्र रजि खरेदीखताच्या दस्ताअन्वये सुमैय्या समीर शेख व शहेनाज लियाकत शेख यांना खरेदी दिली होती व आहे. व खरेदीखता अन्वये सुमैय्या समीर शेख व शहेनाज लियाकत शेख यांच्या नावाची नोंद फेरफार नं. १२२०५ प्रमाणे मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला लागलेली होती व आहे.

सन २०१३ साली लियाकत मोहम्मद शेख व इतर यांनी नगर भूमापन अधिकारी यांच्याकडे अर्ज देऊन त्यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राची पोट हिस्सा मोजणी करिता अर्ज दिला व अर्जाअन्वये रजिस्टर नं. २०५/२०१३ अन्वये सि.स.नं. ६४४८/१ करिता मूळ मिळकत पत्रिका कायम ठेवून दि. २९/०७/२००९ व ११/०९/२०१३ चे नोंदीतील धारकाचे नावे कमी करून सि.स.नं ६४४८/२चे क्षेत्र १६०.४० चौ.मी. नवीन मिळकत उघडण्यात येऊन क्षेत्र/धारक दाखल केले.

तदनंतर मिळकत सि.स.क्र. ६४४८/१ व सि.स.क्र. ६४४८/२ हे विभक्त झाले आहे त्यामुळे शेख इम्रान अयाज यांचा सि.स.क्र. ६४४८/२ या मिळकतीशी कोणताही हितसंबंध, हक्क व अधिकार राहिलेला नव्हता व नाही. लियाकत मोहम्मद शेख व इतर यांनी महानगरपालिका अहमदनगर यांच्याकडे रीतसर अर्ज देऊन मिळकत सि.स.क्र. ६४४८/२ वर बांधकाम करण्याकरिता रीतसर परवानगी घेतली होती व आहे तसेच लियाकत मोहम्मद व इतर यांनी दि. १३/१०/२०१४ रोजी मोनालिस हाइट्स अपार्टमेंटचे महाराष्ट्र ओनरशिप अपार्टमेंट ॲक्ट १९७० अन्वये डीड ऑफ डिक्लेरेशनची नोंदणी दस्त क्र. ४२००/२०१४ अन्वये नोंदविले आहे.

आमचे आशील हुजेफा फिदाहसेन सालुजी व तसनीम हजेफा सालुजी यांनी सि.स.क्र. ६४४८/२ मधील मोनालिस हाइट्स मधील दुकान नं. १ ते ६ ही लियाकत मोहम्मद शेख व इतर तीन यांच्याकडून दि. २८/०७/२०१९ रोजी संपूर्ण भरणा देऊन दुय्यम निबंधक यांच्याकडे खरेदीखताचा दस्त लिहून नोंदवून घेतलेला आहे. सदर खरेदीखताच्या अनुसार मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्कासदरी आमचे आशील हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी यांचे नाव फेरफार क्र. २५७४० अन्वये लागलेले आहे.

त्यामुळे शेख इम्रान अयाज व त्यांच्या कुटुंबाचा मिळकत सि.स.क्र. ६४४८/२ मध्ये कोणताही हक्क, अधिकार व हितसंबंध राहिलेला नव्हता व नाही तसेच मिळकत ६४४८/२ या मिळकतीस लिस पेंडन्सीची नोंद रद्द झालेली आहे. तसेच इम्रान अयाज शेख व इतर यांनी शेख लियाकत मोहम्मद व इतर यांच्या विरूद्ध मिळकतीबाबत दाखल केलेला दावा क्र. ४१५/२०१४ हा मे. कोर्टाने दि. २७/११/२०१७ रोजी रद्द केलेला आहे.

आमचे आशील हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी हे खरेदीखता अन्वये मालक झालेले आहेत व मिळकतीचे टायटल देखील क्लिअर आहे. आमच्या आशीलास त्यांनी खरेदी केलेली मिळकत हस्तांतर करण्याचा पूर्ण कायदेशीर अधिकार आहे. यापूर्वी देखील शेख इम्रान अयाज यांनी अशाच प्रकारे लोकांची दिशाभूल करणारी खोटी, लबाडीची बेकायदेशीर असे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले होते. त्याचप्रमाणे आज देखील केवळ पैसे उकळण्याच्या दृष्ट हेतूने सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध केले आहे. व लोकांची दिशाभूल होऊ नये म्हणून सदरचे जाहीर प्रगटनास उत्तर असे.

**मिळकतीचे वर्णन:**

अ. जि. अहमदनगर. सब. डि. नगरपैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर नगर येथील सर्जेपुरा भागातील सिटी सर्व्हे नं. ६४४८/२ क्षेत्रफळ १६०.४० चौ.मी. यावर बांधलेले मोनालिस हाइटस यापैकी ग्राउंड फ्लोअर वरील शॉप नं. १ ते ६.

दिनांक : २६/१०/२०२६

ठिकाण : अहमदनगर

**ॲड. फारुख बी. शेख,ॲड. नुमेर एफ. शेख**

मो. ९८२२६२२७०५ मो.८०८७८६९४२३

ऑफिस : मिसाळ गल्ली, तेलिखुंट, अहमदनगर.

क्र. एन.आर./मकानसं.१२३२/A-15/भिंगार/स.बा /२०२६-२७ दिनांक– २२/१०/२०२६

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, मयुर चंद्रकांत बोळे, वय ४० वर्षे राहणार सावतानगर, नागरदेवळे, अहिल्यानगर यांनी घर नं. १२३२/A-15 कृष्ण गोपाल हौसिंग सोसायटी सर्व्हे नं. २११/१२८१–PT भिंगार अहिल्यानगर छावनी परिषद हे रजिस्टर खरेदीखत क्रं. ३१३४/२०२६ दिनांक ०७/०४/२०२६ च्या आधारावर आपले नावावर वर्ग / दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहिल्यानगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क / हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. १२३२/A-15, कृष्ण गोपाल हौसिंग सोसायटी

क्षेत्रफळ– ४००.०० चौ. फुट

| | |
|---|---|
| कार्यालय अधिक्षक<br>कृते मुख्य अधिशासी अधिकारी,<br>अहिल्यानगर छावनी परिषद<br>(विकास कुमार) | **Office Supdt.**<br>For Chif Executive<br>Officer, Ahilyanagar<br>Cantonment Board<br>**(Vikas Kumar)** |

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **मंगल सुनिल लोखंडे, परेश सुनिल लोखंडे व मंदार सुनिल लोखंडे, रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज, अव्वल जप्ती, इजमेंट इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **७ (सात)** दिवसाचे आत समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क हितसंबंध आहे त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–**

डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका अहिल्यानगर पैकी महानगरपालिका हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिंगार येथील सर्व्हे नं. ३६३/१व२व३व४/३६४/१व२/३६५/३६६/१व २व३/३६७ मधील प्लॉट नं. २३ याचे एकुण क्षेत्र ३२६.४३ चौ. मी. ही संपूर्ण मिळकत.**

**यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–**

पुर्वेस :– ओपनस्पेस, दक्षिणेस :– प्लॉट नं. २४,

पश्चिमेस :– ६ मी. रस्ता, उत्तरेस :– डि.पी. रस्ता,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक प्लॉट मिळकत तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

अहिल्यानगर, दिनांक :– २६/१०/२०२६

**ॲड. मोहित कांतीलाल बोरा**

ऑफिस नं. ७ ड, साक्षी चेंबर्स, जुन्या कोर्टा जवळ, अहिल्यानगर.

मो. नं. ९८८१९६६२२१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक यांच्या मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली असून आमच्या अशिलाकडून सदर विसारपोटी रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीवर **श्री गुरुदत्त मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि मुख्य कार्यालय वासुंदे ता. पारनेर जि. अहिल्यानगर या सोसायटीचे कर्ज आहे. याव्यतिरिक्त सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–**

डि।। अहिल्यानगर सब डि।। व ता. नगर पैकी जिल्हापरिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे पोखर्डी येथील शेत जमिनीचा सर्व्हे नं. ९ याचे क्षेत्र ०हे. ८१ आर. याचा आकार ३रु.१९ पैसे.यापैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे मध्यभागाचे क्षेत्र ०हे. ३९ आर ही संपूर्ण मिळकत.**

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :–**

पुर्वेस – गट नंबर ९ मधील वारुळे यांची मिळकत,

दक्षिणेस – रस्ता,

पश्चिमेस – गट नंबर ९ मधील सुसे यांची मिळकत,

उत्तरेस – गट नंबर ८ व ६,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

ठिकाण – अहिल्यानगर, दिनांक – २६/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**

**ॲड. ओंकार पंडीत मोरे**

ऑफिस– फ्लॅट नं. ४, गुरुप्रसाद अपार्टमेंट

पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३



वाडिया पार्क लेडीज क्लबने कोजागिरी पौर्णिमा साजरी करताना दिव्यांगांच्या कलेला वाव देण्याकरता खास कार्यक्रम आयोजित केला होता.

# वाडिया पार्क लेडीज क्लबतर्फे कोजागिरी पौर्णिमा उत्साहात

नगर – वाडिया पार्क लेडीज क्लबने महाजन गल्लीतील ज्ञानेश्वर हॉल येथे कोजागिरी पौर्णिमा साजरी केली. यात दिव्यांगांच्या कलेला वाव देण्याकरता एक खास कार्यक्रम आयोजित केलेला होता. या कार्यक्रमात गौरी इंगळे हिचे गायन व अमर सोनवणे याचे तबला वादन हे दोन महत्त्वाचे संगीताचे कार्यक्रम होते. दोघांनीही मंत्रमुग्ध केले.

सूत्रसंचालन सुनिता देव हिने केले. कलाकारांचा परिचय स्नेहा रानडे यांनी करून दिला. या कार्यक्रमाच्या वेळेस कोजागिरीसाठी सांगितलेले मसालेदार दूध व कच्ची दाबेली ही जबाबदारी सेक्रेटरी मीना पाठक यांनी घेतलेली होती. या कार्यक्रमात जवळपास ५० महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. नीलिमा औटी होत्या. सभासदांनी उस्फूर्त आर्थिक अनुदान देऊन या दिव्यांग कलाकारांचे कौतुक केले. सुरेखा डावरे हिने आर्थिक मदत केली.

# स्त्रीच्या आत्मसन्मानाचा वेध घेणाऱ्या 'अबीर' चित्रपटाचे नवे पोस्टर झळकले

### विशेष भूमिकेत नगरचा अभिनेता प्रशांत नेटके झळकणार

नगर – सौंदर्याच्या पारंपरिक व्याख्यांना छेद देत स्त्रीच्या आत्मसन्मानाचा, मनोधैर्याचा आणि अस्तित्वाच्या संघर्षाचा वेध घेणारा अबीर हा मराठी चित्रपट रसिकांच्या मनात कुतूहल निर्माण करत आहे. मराठी चित्रपटाचा डंका सातासमुद्रापार घुमवणाऱ्या अबीरने आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतील निवडीमुळेही विशेष लक्ष वेधून घेतले आहे. आता विजयादशमीच्या मंगल मुहूर्तावर प्रदर्शित करण्यात आलेल्या चित्रपटाच्या नव्या पोस्टरने या उत्सुकतेत आणखी भर घातली आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन, सौंदर्याच्या कल्पनांमागील पूर्वग्रह आणि तिच्या अंतर्मनातील भावविश्व यांची झलक देणारे हे पोस्टर चित्रपटाच्या आशयाविषयी अनेक प्रश्न उपस्थित करते.



प्रशांत नेटके




सुदेश वसंतराव झावरे पाटील यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. शंभो एंटरटेनमेंट व श्री महाकाल प्रॉडक्शन्स यांनी हा चित्रपट प्रस्तुत केला आहे. आकाश विष्णू शिंदे यांनी अबीर या चित्रपटाचे पटकथा, संवाद व दिग्दर्शन केले आहे. सौंदर्यामुळे स्त्रीच्या कलागुणांपेक्षा तिच्यातील उणिवांनाच अधिक महत्त्व देणाऱ्या सामाजिक मानसिकतेवर चित्रपट भाष्य करतो. स्त्रीने आत्मविश्वासाने उभे राहावे, तिच्यावरील भेदभाव आणि अत्याचार थांबावेत, हा या निर्मितीमागील महत्त्वाचा हेतू आहे. पोस्टरमध्ये गडद केशरी–तपकिरी रंगछटांच्या पार्श्वभूमीवर उमटलेली स्त्रीची छायाकृती, प्रकाश–सावल्यांचा खेळ आणि मध्यभागी झळकणारे सौंदर्य चेहऱ्यात शोधायचं की संस्कारात? हे प्रश्नार्थक वाक्य लक्ष वेधून घेते. बाह्य सौंदर्यापेक्षा अंतर्मनातील संस्कार आणि व्यक्तिमत्त्वाचे मोल अधोरेखित करणारा हा दृश्यात्मक आशय चित्रपटाच्या मध्यवर्ती विचाराची चाहूल देतो. दिग्दर्शक आकाश शिंदे यांच्या मांडणीतून स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा आणि तिच्या सामर्थ्याची जाणीव समाजाला व्हावी, हा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न आहे. जर्मनीतील २२ व्या इंडियन फिल्म फेस्टिव्हल स्टुटगार्टमध्ये निवड झाल्यानंतर अबीरची जागरण फिल्म फेस्टिव्हल, दिल्ली येथेही निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या निवडींमुळे चित्रपटाच्या सामाजिक आशयाला व्यापक व्यासपीठ मिळाले आहे.

प्रोडक्शन विष्णू घोरपडे यांचे असून, कार्यकारी निर्माता मंगेश भीमराज जोंधळे (प्रसिद्धी आणि वितरण) आहे, छायांकनाची जबाबदारी निशांत भागवत यांनी सांभाळली असून, सह–दिग्दर्शन अमित खंडागळे, सचिन नागरे तसेच निलेश गावंड यांनी संकलन केले आहे. संगीत आणि पार्श्वसंगीत रोहित नागभिडे यांचे असून आर्या आंबेकर, वैशाली माडे, राधा खुडे यांनी या चित्रपटातील गीतांचे पार्श्वगायन केले आहे. सुजित सुरवसे यांनी रंगभूषा, तर स्नेहल नार्वेकर यांनी वेशभूषेची जबाबदारी पार पाडली आहे. महेश गोरे यांनी कला दिग्दर्शन, विकास खंदारे यांनी ध्वनी संयोजन, तर स्वरूप जोशी यांनी ध्वनी संकलन केले आहे.

### वाईट प्रवृत्तींवर चांगुलपणाचा विजय

प्रदर्शित करण्यात आलेल्या अबीरच्या पोस्टरबाबत दिग्दर्शक शिंदे म्हणाले, अभिनेता प्रशांत नेटके यांनी या चित्रपटात विशेष भूमिका असल्याचे सांगताना ते म्हणाले, आता पर्यंत पोलीस अधिकारी, डॉक्टर,पायलट, आर्मी ऑफिसर, कान्होजी जेधे, खंडोबा, अशा अनेक खलनायकी भूमिका केल्या, पण या चित्रपटात पहिल्यांदाच विनोदी भूमिका साकारली आहे, त्यामुळे प्रेक्षकांच्या प्रतिक्रियेची उत्सुकता वाढली आहे.पोस्टरमधील सूचक मांडणी, भावनांची गूढ किनार आणि त्यातून उमटणारा आशय कथानकातील अनेक पदरांविषयी उत्सुकता जागवतो. विजयादशमी हा वाईट प्रवृत्तींवर चांगुलपणाच्या विजयाचा सण आहे. त्याच धर्तीवर सौंदर्याच्या संकुचित कल्पनांवर माणुसकीच्या उदात्त विचारांचा विजय व्हावा, हीच अबीरमागील भावना आहे.

### नगरच्या कलाकारांच्या विविध भूमिका

निर्माते सुदेश झावरे पाटील म्हणाले, सौंदर्याला वर्णाच्या चौकटीत बंदिस्त करणाऱ्या मानसिकतेवर प्रहार करताना स्त्रीच्या कर्तृत्वाला, तिच्या जिद्दीला आणि स्वाभिमानाला नवा आयाम देण्याचा आमचा प्रयत्न आहे. अबीरच्या पोस्टरमधील प्रत्येक भावछटा ही केवळ कथानकाची चाहूल नसून, समाजाच्या डोळ्यांवरील पूर्वग्रहांची झापडे दूर करण्याचे एक संवेदनशील आवाहन आहे. पायल जाधव, निखिल चव्हाण, देविका दफ्तरदार, अविनाश नारकर, प्रशांत नेटके, गणेश देशमुख, प्राजक्ता हनमघर, गार्गी फुले, यश डिंबळे, रोशन सुनील राऊत, गायत्री सुदेश झावरे, रेखा दहातोंडे, राजवर्धन झावरे, साईराज केंद्रे यांच्या या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. तसेच अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनीही चित्रपटांमध्ये विशेष भूमिका साकारली आहे.

## गुरुवाणी – ९१



### बहुश्रुत बना...

जो ज्याची पूजा करतो तसा होतो. निर्वाण कल्याणक देशनामध्ये जीवनाचे अनेक रहस्य दडलेले आहेत. खूप शिकूनही आपण ज्ञानी का बनत नाही? जे ऐकले त्याची अनुभूती घेणे महत्त्वाचे असते. जीवनात बहुश्रुत कसे बनायचे? जो लोभी असतो, ज्याचे स्वतःवर नियंत्रण नसते त्याला परमात्मा अबहुश्रुत म्हणतात. त्यांना शिक्षा प्राप्त होत नाही. आपण विद्यार्थी, शिक्षाशील बनले पाहिजे, असे व्हिजन तीर्थंकर प्रभू प्रदान करतात. जो नतर स्वतःवर अनुशासन करतो, जो दुसऱ्यातील उणीवा शोधत नाही, जो सुशील आहे, क्षमाशील आहे, असा व्यक्ती ज्ञान ग्रहण करू शकतो. क्रोधी व्यक्ती अहंकारी असतो. तो कायम दुसऱ्यापेक्षा स्वतःला श्रेष्ठ मानतो. असे व्यक्ती कधीही शिकत नाहीत. जे स्वतःला संपूर्ण ज्ञानी समजत नाहीत, तेच शिक्षण ग्रहण करू शकतात. जो मैत्रीची भक्ती करतो. तीर्थंकर भगवान महावीर यांनी साधक होण्यासाठी निर्मलता आणि सगळ्यांशी मैत्री भाव या अटी सांगितल्या आहेत. मैत्रीचा अर्थ म्हणजे संपूर्ण जगातील पॉझिटिव्ह स्पंदने ग्रहण करणे असते. बहुश्रुत कधीही कोणाची अवहेलना करत नाही. आपण एखादा चुकला की लगेच त्याचा तिरस्कार करतो. यामुळे आपल्या आतील चांगुलपणाची जागृती होत नाही. जिगरी मित्राचीही पाठिमागे निंदा करणारे असतात. अनेक जणांशी आपले मैत्रीचे संबंध असतात पण ते प्रिय नसतात. काही जण आपल्या परिवारातील सदस्य, संघटनेच्या सदस्यांविषयी निगेटिव्ह बोलतात. तो परिवार, संघटन कधीच मजबूत होत नाही. असे करणारे कायम अस्वस्थ असतात. परिवारात शांती हवी असेल तर एकमेकांविषयी तिसऱ्याकडे निगेटिव्ह बोलू नका. संकल्प करा, 'मै कभी मेरे सहयोगी की बुराई नहीं करूगा.' जे मिळाले ते वाटून खातो त्याला एक ना एक दिवस मोक्ष मिळतो. आपणही परमात्म्याने जे दिले ते शेअर केले पाहिजे. जे ज्ञान मिळाले आहे, ते इतरांना द्या. आपण आपला धर्म जगाबरोबर शेअर करूया. आचार्यश्रींना अजातशत्रू म्हणायचे, कारण ते सर्वांना प्रिय होते. शंख निर्मल असतो, त्यात दूध मिसळले तर शंख आणि दूधही अधिक उज्वल होते. असे व्यक्ती बहुश्रुत असतात. गुरूदेव श्रमण संघाचे आचार्य बनले आणि दोघांचीही गरीमा वाढली. असे व्यक्ती कोजागिरीच्या चंद्राप्रमाणे शितल आणि पूर्ण असतात. परमात्मा सांगतात, चमत्काराला नमस्कार करू नका, ज्ञानाला नमस्कार करा. जे भूतकाळातील चुकांमधून शिकतात तेच सुधारतात. कोणालाच कधी चुकीचा मार्ग दाखवू नका.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## गुरुवाणी – ९२



### ध्येयाशी बेईमानी नको..

विना भांडण काही वेळा प्रेमाचे संबंध दुरावतात. याला कारण असलेला व्हायरस शोधला पाहिजे. परमात्मा सांगतात, 'जे तुम्हाला माहीत नसते त्याला तुम्ही नशिबावर सोडून देता. यापेक्षा ते काय आहे हे माहिती करून घ्या'. सर्व पुण्य पापात रूपांतरित करणारा व्हायरस समजून घेतला पाहिजे. दोन भावांची एक कथा आहे. ते जनावरं चरायला जंगलात गेले. तिथे दोघांचा सर्पदंशाने मृत्यू झाला. पुढच्या जन्मी ते हरिण बनले. दोघांचीही एका शिकाऱ्याने शिकार केली. नंतरच्या जन्मात ते दोघे हंस बनले. एकाने दोघांनाही ठार मारले. नंतर ते दोघेही चंडाळ कुलात जन्मले. चित्र व संभूती अशी दोघांची नावे होती. त्यांचे वडील जल्लादचे काम करातचे. तिथल्या राजाच्या मंत्र्यांची बेइमानी पकडली गेली व राजाने त्याला मृत्युदंड देण्यासाठी जल्लादाकडे सोपवले. जल्लाद त्या मंत्र्याला प्रस्ताव देतो, तू माझ्या मुलांना ज्ञानदान कर मी तुला मारणार नाही. मंत्र्याने हा प्रस्ताव मान्य करून त्या मुलांना शिकवायला सुरुवात केली. काही काळाने मंत्री जल्लादाच्या पत्नीकडे आकृष्ट होतो. हे कळल्यावर जल्लाद मंत्र्याला मारण्याचे ठरवतो. दोन मुलं आपल्या गुरूला वाचवण्यासाठी त्याला पळवून लावतात. मंत्री दुसऱ्या राज्यात जातो. इकडे ती दोन मुलं आपल्या कलेने लोकांना आकर्षित करतात. पण ते जल्लादाची मुलं असल्याने लोक त्यांचा धिक्कार करतात. ते दुःखी होतात. दोघेही नैराश्यात डोंगरावर आत्महत्या करण्यासाठी जातात. तिथं एक योगी त्यांना समजतो. जग तुमचा तिरस्कार करते, पण तुम्ही स्वतःचा कशाला तिरस्कार करता. त्या दोघा भावांना रस्ता गवसतो व ते श्रमण बनतात. ते मोठी तपस्या करून त्याच मंत्र्याच्या राज्यात पोहचतात. मंत्री त्यांना ओळखतो. मंत्री आपले रहस्य उघड होईल या भीतीनं मुनींची पिटाई करवतो. तेव्हा संभूतीने आपल्या तपस्या शक्तीने संपूर्ण नगरीत हाहाकार उडवला चित्र संभूतीला आवरतो. या घटनेनंतर दोघांनी क्षमाभाव ठेवून संथारा घेण्याचे ठरवले. राजाची राणी त्या योगींच्या दर्शनासाठी येते. तिला पाहून पुढच्या जन्मी अशी राणी मिळावी अशी भावना संभूतीच्या मनात जागृत होते. पुढच्या जन्मी संभूती ब्रम्हदत्त चक्रवर्ती बनला. चित्र श्रेष्ठीच्या कुळात जन्म घेतो. संभूतीला एका घटनेने पूर्वजन्मीचे सगळे आठवते. पाच जन्म बरोबर असलेला भाऊ आता कुठं आहे? हा प्रश्न पडतो. तो शोध सुरू करतो. दोघेही एके ठिकाणी भेटतात. आपल्या ध्येयाशी कधी बेईमानी करू नका. संभूतीने साधनेशी बेइमानी केली म्हणून तो भावापासून वेगळा झाला. चुका होतात पण चुका सुधारल्या नाही तर त्या वाढतच जातात. यासाठी प्रतिक्रमण आवश्यक आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# नगरमध्ये २८ ऑक्टोबरपर्यंत हत्तीरोग रक्तनमुने सर्वेक्षण मोहीम

### रात्री १० ते १२ या वेळेत नागरिकांचे रक्तनमुने घेणार; शहरातून ९०० नमुने संकलित करण्याचे उद्दिष्ट

नगर – महानगरपालिकेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा हिवताप कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात हत्तीरोग रात्र रक्तनमुने सर्वेक्षण (NBS) मोहीम राबविण्यात येणार आहे. २६ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत दररोज रात्री १० ते १२ या वेळेत हे सर्वेक्षण करण्यात येणार असून, संपूर्ण शहरातून एकूण ९०० रक्तनमुने संकलित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या सर्वेक्षणासाठी स्थलांतरित नागरिकांची वस्ती असलेले भाग, झोपडपट्टी परिसर तसेच यापूर्वी हत्तीरोगाचे सर्वाधिक रुग्ण आढळलेल्या भागांना प्राधान्य दिले जाणार आहे. निवडक ठिकाणी २० वर्षे व त्यावरील वयोगटातील नागरिकांचे रात्रीचे रक्तनमुने घेऊन त्यांची हत्तीरोगाच्या जंतूंसाठी तपासणी करण्यात येणार आहे.

हत्तीरोगाचे जंतू म्हणजेच मायक्रोफायलेरिया रात्रीच्या वेळी रक्तात अधिक सक्रिय असल्याने रात्री १० वाजल्यानंतरच रक्तनमुने संकलित केले जाणार आहेत. या तपासणीतून हत्तीरोगाच्या जंतूंचा संसर्ग शोधण्यास मदत होणार आहे. सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या निष्कर्षांच्या आधारे फेब्रुवारी २०२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या सामूहिक औषधोपचार मोहिमेचे (MD) नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे हत्तीरोग नियंत्रण आणि निर्मूलनाच्या दृष्टीने या सर्वेक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

महानगरपालिका आरोग्य विभाग आणि जिल्हा हिवताप कार्यालयाच्या वतीने नागरिकांना या मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य कर्मचारी रक्तनमुना घेण्यासाठी घरी किंवा परिसरात आल्यास नागरिकांनी त्यांना सहकार्य करावे. रक्तनमुना देण्याची प्रक्रिया सुरक्षित असून, हत्तीरोग निर्मूलनासाठी ती महत्त्वाची आहे. ही मोहीम वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आणि जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नारायण वायभासे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

शहरातील नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून हत्तीरोग निर्मूलनाच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## भरदिवसा घरफोडी; सोन्या-चांदीचे दागिने चोरट्यांनी केले लंपास

नगर – पारनेर तालुक्यातील टाक़ळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीवरील एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात तीन चोरांनी ३ लाख ९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे वेगवेगळे दागिने भरदिवसा चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंगल संतोष गोरडे (वय ४५, रा. खिलारी वस्ती, टाक़ळी ढोकेश्वर, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी १.१० ते रात्री ८ वाजे दरम्यानच्या कालावधीत ही घटना घडली. फिर्यादीच्या राहत्या घराचे कुलूप कशाच्या तरी साहाय्याने तोडून अज्ञात तीन अनोळखी इसमांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील सामानाची उचकापाचक करून कपाटातील ३ लाख ९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे विविध दागिने चोरून नेले. या प्रकरणी मंगल गोरडे यांच्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रणजित मारग करत आहेत.

# मुळा धरणातील पाणीसाठा पिण्यासाठीच राखीव ठेवावा

### महापौर, उपमहापौर यांच्यासह नगरसेवकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने मुळा धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून तो पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवावा, अशी मागणी महापौर ज्योती गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने मुळा धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून तो पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवावा, अशी मागणी महापौर ज्योती गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. पावसाळ्यातच पाण्याची टंचाई जाणवू लागली असून, हिवाळा आणि उन्हाळा अद्याप बाकी असल्याने आगामी काळातील पाणीपुरवठ्याचे आतापासून नियोजन करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी उपसभापती वर्षाताई सानप, माजी उपमहापौर गीतांजली काळे, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, बाळासाहेब बारस्कर, अजिंक्य बोरकर, जितू गंभीर, महेश तवले, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, मयुरी जाधव, पौर्णिमा गव्हाळे, मोहित पंजाबी, सुनीता भिंगारदिवे, सुजाता पडोळे, सुनीता फुलसौंदर, सुमित लोंढे, मयूर बांगरे, रेवन्नाथ पवार, मयुरी लोंढे यांच्यासह नगरसेवक अनेक नगरसेवक उपस्थित होते.

### पाणी टंचाईचे संकट तीव्र

महापौर गाडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, अल निनोच्या पार्श्वभूमीवर मुळा पाटबंधारे विभागाने पाण्याचे आवर्तन सुरू केले असून, याबाबत वृत्तपत्रांत बातम्याही प्रसिद्ध झाल्या आहेत. शेवगाव व पाथर्डी तालुक्यांतील काही गावांना अद्याप पिण्यासाठी पाणी पोहोचलेले नाही; मात्र नेवासा तालुक्यातील ओढ्यांमधून जायकवाडी धरणात पाणी जात आहे. या टंचाईसदृश परिस्थितीमुळे भविष्यात पाणी संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, शहरी तसेच ग्रामीण भागात पाणीकपात करण्याची वेळ येऊ शकते.

### टंचाईत पाण्याचा अपव्यय नको

२२ ऑगस्ट रोजी मुळा धरणातून आवर्तन सोडण्यात आले, त्या वेळी धरणातील पाणीसाठा २४.६०० दशलक्ष घनफूट होता. त्यावेळी धरणात काही प्रमाणात नवीन पाण्याची आवकही सुरू होती. त्यानंतर जवळपास ६० दिवस खरीप हंगामासाठी आवर्तन सुरू राहिले. त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी होऊन सध्याच्या स्थितीत तो सर्वसाधारणपणे १६.६०० दशलक्ष घनफूट राहिला आहे. म्हणजेच खरीप हंगामाच्या आवर्तनासाठी जवळपास आठ दशलक्ष घनफूट पाण्याचा वापर झाला आहे. मुळा धरणात सध्या सुमारे १६.५ दशलक्ष घनफूट पाणीसाठा शिल्लक असून, त्यापैकी ४.५ दशलक्ष घनफूट मृतसाठा आणि १२ दशलक्ष घनफूट जिवंत साठा आहे. मुळा धरणाच्या इतिहासात टंचाईसदृश परिस्थितीत एका आवर्तनात एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी खर्च होण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### पाणी बचतीच्या सूचना द्याव्यात

आगामी काळात कोरड्या वातावरणामुळे पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन न केल्यास पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक गंभीर होऊ शकते. अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रासह ग्रामीण भागातील नागरिकांना आगामी टंचाईच्या काळात पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध राहावे, यासाठी संबंधित विभागाला तातडीने पाणी बचतीच्या सूचना द्याव्यात आणि आवश्यक आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी महापौर गाडे, उपमहापौर जाधव यांच्यासह नगरसेवकांनी केली आहे.

# सिद्धार्थनगर ख्रिस्ती दफनभूमीत राबविले स्वच्छता अभियान

### १०० हून अधिक स्वयंसेवकांनी घेतला सहभाग

नगर – सकल ख्रिस्ती समाज आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती दफनभूमी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभियानात ख्रिस्ती समाजातील १०० हून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. महानगरपालिकेच्या स्वच्छता पथकानेही या मोहिमेत सहभागी होत दफनभूमी परिसराची स्वच्छता केली.



सकल ख्रिस्ती समाज आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थ नगर येथील ख्रिस्ती दफनभूमी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. (छायाचित्र – लोकेश बर्वे)

काही दिवसांपूर्वी सकल ख्रिस्ती समाजाच्या वतीने दफनभूमीच्या दुरवस्थेबाबत आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले होते. दफनभूमीतील अस्वच्छता, संरक्षक भिंतीची दुरवस्था आणि परिसरातील विविध समस्यांकडे समाजाने प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या निवेदनाची दखल घेत आयुक्त डांगे यांनी स्वतः दफनभूमीला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती. तसेच दफनभूमीच्या आवश्यक दुरुस्तीची कामे करण्याबाबत आश्वासन दिले होते. याच अनुषंगाने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले.

### स्वच्छता राखण्याचे आयुक्तांचे आवाहन

या वेळी आयुक्त डांगे यांनी परिसरातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत रस्त्यावर किंवा उघड्यावर कचरा टाकू नये, घरासह परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन केले. आजचे स्वच्छता अभियान यशस्वी झाल्याचे सांगत भविष्यातही या परिसरात सातत्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले. स्वच्छता अभियानात सातत्य राखण्यासाठी समाजबांधव घेत असलेल्या पुढाकाराचे आयुक्तांनी कौतुक केले. नागरिक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवता येतो, असेही त्यांनी नमूद केले.

### स्वच्छतेप्रती जागरूकता केली अधोरेखित

या स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून सकल ख्रिस्ती समाजाने सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक स्वच्छतेप्रती आपली जागरूकता अधोरेखित केली. समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग आणि महानगरपालिकेच्या सहकार्यामुळे दफनभूमी परिसराच्या स्वच्छतेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि प्रशासनाची सकारात्मक भूमिका यांचा समन्वय साधल्यास नागरी समस्यांचे प्रभावी निराकरण शक्य असल्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला. यावेळी सकल ख्रिस्ती समाजाचे पदाधिकारी, समाजबांधव आणि महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## जालिंदर बोरुडे यांच्या ३४ वर्षांच्या नेत्रसेवेचा गौरव



नगर – दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी गेल्या ३४ वर्षांपासून अखंडपणे नेत्रसेवेचे कार्य करणारे फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल कार्य गौरव सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले. दिव्य दृष्टी फाउंडेशन आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सन्मान सोहळ्यात ब्रिगेडिअर राजीव चावला आणि उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बोरुडे यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला धनश्री विखे, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, हरजितसिंघ वधवा आणि दिव्य दृष्टी फाउंडेशनचे कृष्णा तवले आदी उपस्थित होते. गेल्या साडेतीन दशकांपासून नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजातील गरजू नागरिकांना दृष्टीचा आधार देणाऱ्या बोरुडे यांच्या कार्याची यावेळी विशेष दखल घेण्यात आली.

फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून बोरुडे यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांपर्यंत नेत्रसेवेचा लाभ पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आर्थिक अडचणींमुळे डोळ्यांचे आजार असूनही उपचार घेणे शक्य होत नसलेल्या रुग्णांसाठी त्यांनी विविध ठिकाणी नेत्रतपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन केले.

या शिबिरांमधून गरजू रुग्णांची नेत्रतपासणी करून आवश्यक उपचारांची व्यवस्था करण्यात आली. तसेच मोतिबिंदूचा त्रास असलेल्या अनेक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांसह गरजू रुग्णांना पुन्हा स्पष्टपणे पाहण्याची संधी मिळाली. दृष्टीच्या समस्येमुळे दैनंदिन जीवनात अडचणींचा सामना करणाऱ्या रुग्णांना दिलासा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले.

